




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २४७ * नांदेड * मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ‘गणपती बाप्पा मोरया’चा जयघोष; ढोल-ताशांच्या गजरात ‘श्री’ गणरायाचे जल्लोषात आगमन

## ९ वर्षांनंतर १२ दिवसांचा गणेशोत्सव; पर्यावरणपूरक उत्सवाकडे नांदेडकरांचा कल





**नांदेड (प्रल्हाद कांबळे)** – यावर्षी पावसाने मराठवाड्यावर डोळे वटारले. दुष्काळाचे सावट निर्माण झाले. पावसाभावी पिकांच्या वाढीवर परिणाम झाला. ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण पसरले. या प्रतिकूल परिस्थितीतही नांदेडमध्ये गणेश भक्तांच्या उत्साहाला मात्र उधाण आले. गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया... जयघोष करत ढोल-ताशांच्या गजरात आपल्या लाडक्या गणरायाचे गणेश भक्तांनी उत्साहात स्वागत केले.

विघ्नहर्ता मंगलमूर्ती श्री गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा संपून सोमवार, दि. १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला उत्साहात प्रारंभ झाला आहे. तब्बल ९ वर्षांनंतर यंदाचा गणेशोत्सव १२ दिवसांचा असणार असून दि. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला विसर्जन होणार आहे. गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात घरोघरी आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरासह जिल्ह्यातील सार्वजनिक मंडळांनी जय्यत तयारी पूर्ण केली. विशेषतः जुना मोंढा, जुना कौठा, वसरणी आणि अर्धापूर तालुक्यातील महादेव पिंपळगाव परिसरात गणेशमूर्ती तयार करण्याचे कारखाने असल्याने तेथे खरेदीसाठी गणेश भक्तांची मोठी गर्दी झाली होती. यंदा मूर्तीच्या दरात मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २५ टक्क्यांनी वाढ झाली असली तरी भाविकांनी उत्साहाने मूर्ती खरेदी केली. अनेक सार्वजनिक मंडळांनी काही दिवस आधीच मूर्ती निश्चित करून मंडपात विराजमान केल्या आहेत.

यंदा पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर देण्यात येत आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक सजावटीचे साहित्य, निर्माल्य संकलन आणि कृत्रिम विसर्जन कुंडांचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे धार्मिक परंपरा जोपासतानाच जलप्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे.

गणेशोत्सवासोबतच गौरी आगमनाचीही लगबग सुरू झाली आहे. बाजारपेठेत आकर्षक सजावटीचे साहित्य दाखल झाले असून महालक्ष्मी हार, पैजण, छल्ले, अंबाडे, गजरे, गंगावन आदी साहित्य खरेदीसाठी महिलांची मोठी गर्दी आजच पहावयाला मिळाली. शहराच्या वजिराबाद, श्रीनगर, शिवाजीनगर, जुना मोंढा, बरकी चौक, मोहम्मद अली रोड, गांधीनगर, आनंदनगर, हडको सिडको बाजारपेठ या भागात गर्दी होती.

**पोलीस प्रशासनाचे आवाहन**

उत्सव शांततेत आणि शिस्तीत साजरा करण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने सूचना दिल्या आहेत. डीजेचा वापर टाळून पारंपरिक ढोल-ताशा पथकांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सुरक्षेसाठी अनेक मंडळांनी सीसीटीव्ही बसविले असून स्वयंसेवक नेमले आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. गणेश उत्सव काळात पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात केला असून जागोजागी पोलिसांची करडी नजर राहणार आहे. काही भागात संवेदनशील गणपती असल्याने त्या ठिकाणी तगडा बंदोबस्त लावण्यात आला असून आपल्या गणेश मंडळाच्या अवतीभवती अनोळखी किंवा संशयास्पद व्यक्ती फिरत असेल तर त्याला त्याबद्दल तातडीने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांशी संपर्क साधून त्याची माहिती द्यावी. शहरात व जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था बाधित करणाऱ्या व्यक्तींचा बायोडाटा पोलीस दलाकडून तयार करण्यात आला असून गणेशोत्सवाच्या दरम्यान अनेकांना प्रतिबंधक नोटीसा देण्यात आल्या आहेत.

यंदा दुष्काळाचे सावट असले तरी भाविकांमध्ये विशेष उत्साह असून खासदार अशोकराव चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, खासदार प्रा. रवींद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार अमर राजूरकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्यासह लोकप्रतिनिधींच्या घरीही बाप्पाचे जल्लोषात आगमन झाले.

# चंद्राच्या आड लपला शुक्र ग्रह; नांदेडसह भारतात खगोलीय घटना



**नांदेड (प्रतिनिधी)** – सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी आकाशात शुक्र-चंद्र पिधानाची दुर्मिळ खगोलीय घटना घडली. ही घटना भारतात विशेषतः दक्षिण आणि मध्य भारत, तसेच आशिया आणि युरोपच्या काही भागांतून पाहायला मिळाली.

सायंकाळी ५.२२ वाजता शुक्र ग्रह चंद्राच्या उत्तर श्रृंग भागातून नाहीसा झाला, म्हणजे चंद्रकोरीमागे लपला आणि सुमारे एका तासाने ६.१८ वाजता चंद्राच्या खालच्या बाजूने तो पुन्हा बाहेर पडला.

स्पर्श आणि मोक्ष कालावधीदरम्यान सूर्य आकाशात असल्याने तसेच आकाश ढगाळ असल्याने हे विलोभनीय पिधान स्पष्टपणे पाहता आले नाही. मात्र सूर्यास्तानंतर पश्चिम- दक्षिण आकाशात चंद्र आणि शुक्र एकमेकांच्या अत्यंत जवळ आलेली युती पाहायला मिळाली.

छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाच्या एपीजे अब्दुल कलाम खगोल- अंतराळ विज्ञान केंद्राचे संचालक श्रीनिवास औंधकर यांनी या दुर्मिळ युतीचे छायाचित्र टिपले आहे.

# जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाला पोलिसांनी पुन्हा परवानगी नाकारली

## गणेश उत्सवानंतर आणि आझाद मैदान सोडून इतर ठिकाणी परवानगी देण्याचा विचार



**मुंबई (प्रतिनिधी)** – मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आणि सरकारच्या आश्वासनांच्या अंमलबजावणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसण्याच्या तयारीत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांनी पुन्हा एकदा मोठा धक्का दिला आहे. रविवारी आझाद मैदान पोलिसांनी पहिला अर्ज फेटाळल्यानंतर मनोज जरांगे यांच्यावतीने नव्याने उपोषणाची परवानगी मागण्यात आली होती. मात्र, मुंबई पोलिसांनी अत्यंत कठोर भूमिका घेत दुसऱ्यांदाही या आंदोलनाला परवानगी नाकारली आहे.

गणेशोत्सवानंतर जरांगेंच्या उपोषणाला आझाद मैदान सोडून इतर ठिकाणी परवानगी देण्यात येईल, असं पत्रही मुंबई पोलिसांनी दिल्याची माहिती आहे. मात्र, सलग दुसऱ्यांदा परवानगी नाकारल्यामुळे आता मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी १९ सप्टेंबरपासून मुंबईच्या ऐतिहासिक आझाद मैदानावर अनिश्चित काळासाठी आमरण उपोषणाची हाक दिली आहे. १५ सप्टेंबर रोजी ते अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने कूच करणार आहेत.

**मनोज जरांगेंनी प्लान बदलला, एकटेच जाणार**

मुंबईतील मराठा आंदोलनासाठी आझाद मैदान पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या रणनीतीमध्ये बदल केला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आता संपूर्ण मराठा आंदोलकांची फौज सोबत घेऊन न जाता एकट्यानेच मुंबईला जाण्याची घोषणा केली आहे.

# पंढरीत भाविकांसाठी तीन दिवस विठुरायाचे दर्शन बंद

**सोलापूर (प्रतिनिधी)** – महाराष्ट्राचं आराध्य दैवत असलेल्या पंढरीतील विठ्ठल रुक्मिणी मूर्तीवरील रासायनिक लेपनाची प्रक्रिया करायला अखेर मुहूर्त लागला आहे. त्यानुसार, आता २३ ते २५ सप्टेंबर या कालावधीत भारतीय पुरातत्व विभागाकडून विठ्ठल आणि रुक्मिणी मूर्तीवर हे लेपन होणार असल्याचे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी सांगितले आहे.

लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या विठुराया आणि रुक्मिणी माता यांच्या मूर्ती सातत्याने झीजत असल्याने, मंदिर समितीसह भाविकांची चिंता वाढली होती. त्यातच भारतीय पुरातत्व विभागाकडून होणाऱ्या रासायनिक लेपन प्रक्रियेला काही भाविकांनी विरोध करीत न्यायालयात दाद मागितल्याने याला जवळपास तीन महिने उशीर झाला होता. आता मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने या रासायनिक प्रक्रियेला हिरवा कंदील दाखविल्याने आता २२ सप्टेंबर रोजी शेजारतीनंतर भारतीय पुरातत्त्व विभाग आपल्या कामाला सुरुवात करणार आहे, अशी माहिती मंदिराचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

# भारतील महिला क्रिकेट संघ ठरला आशिया चॅम्पियन

**दुबई (वृत्तसंस्था)** – भारतीय महिला क्रिकेट संघाने पुन्हा एकदा आशियाई क्रिकेटवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महिला आशिया चषक २०२६च्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेचा तब्बल ७२ धावांनी पराभव करत विक्रमी आठव्यांदा आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताच्या फलंदाज आणि गोलंदाजांनी एकत्रितपणे शानदार कामगिरी करत श्रीलंकेला कोणतीही संधी दिली नाही.

# राज्यात लाडक्या बाप्पासोबत पावसाचंही आगमन

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यभरात सोमवारी लाडक्या बाप्पासाहेब पावसाचंही आगमन झाल्याचे पहायला मिळालं. सर्वांचे लाडके आराध्य दैवत असलेल्या गणरायाचे आज राज्यभर मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’च्या जयघोषाने शहरांपासून गावागावांपर्यंतचे वातावरण दुमदुमून गेले. मुंबईतील गल्ल्यांपासून कोकणातील छोट्या-छोट्या गावांपर्यंत बाप्पाच्या आगमनाने आनंद आणि उत्साहाला उधाण आले आहे. मुंबईत विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये सकाळपासूनच गणरायाच्या प्रतिष्ठापनेची लगबग सुरू होती.

लालबागचा राजा, चिंतामणी, मुंबईचा राजा यांसह अनेक प्रसिद्ध गणेश मंडळांमध्ये विधिवत पूजा-अर्चा करून श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. बाप्पाच्या आगमनासाठी सजविण्यात आलेले मंडप, आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट यामुळे मुंबईचे वातावरण अधिकच उत्साहपूर्ण झाले आहे.

श्री गणरायाच्या गणरायाच्या आगमनासोबतच पावसाचेही कमबॅक झाल्याचे दिसून येत आहे. मुंबई ठाणे, कोकणापासून ते विदर्भापर्यंत अनेक भागांमध्ये पावसाच्या सरी कोसळत आहे. कुठे रस्ते जलमय झालेत, कुठे गणेश मंडपामध्ये पाणी शिरलं, तर विदर्भ मराठवाड्यामध्ये याच पावसामुळे करपण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना जीवदान मिळाल्याने पावसाचं सावट असलं तरी बळीराजासाठी हा पाऊस दिलासा देणारा ठरला आहे. काही दिवसांच्या विश्रांतीनंतर राज्यांमध्ये पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून हैराण नागरिकांनाही दिलासा मिळाला आहे. तर बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणामध्ये पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी आज देखील राज्यात पावसाचा जोर कायम १४ आणि १५ सप्टेंबर रोजी अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. विशेषतः उत्तर कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही भागांत अतिमुसळधार ते मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचीही शक्यता आहे.

# आ. चिखलीकर यांच्या निवासस्थानी ढोल-ताशांच्या गजरात गणरायाचे आगमन

## शेतकऱ्यांच्या सुखासाठी बाप्पांकडे साकडे




**नांदेड (प्रतिनिधी)** – ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी श्री गणरायाचे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. भक्तिमय वातावरणात श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली.

यावेळी आ. चिखलीकर कुटुंबियांनी विधिवत पूजा-अर्चा करून गणरायाचे दर्शन घेतले. ‘बाप्पा, यंदा शेतकऱ्यांवर आलेले संकट दूर कर. त्यांच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदू दे, पिकांना भरघोस उत्पन्न मिळू दे आणि त्यांच्या कष्टाला सुख-समाधानाची फळे मिळू दे,’ अशी मनोभावे प्रार्थना करीत गणरायाच्या चरणी साकडे घालण्यात आले.

पावसाच्या लहरीपणामुळे आणि पिकांच्या नुकसानीमुळे चिंतेत असलेल्या शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी, त्यांच्या कुटुंबात आनंद नांदावा आणि सर्वांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात, अशी भावना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यावेळी आली.

गणरायाची प्रतिष्ठापना करण्यासाठी यावेळी पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार सुभाषराव साबणे, माजी आमदार अविनाश घाटे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे व चैतन्यबापू देशमुख, ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी, दै. गोदातीर समाचारचे मुख्य संपादक केशव घोणसे पाटील, कालिदास जहागीरदार, धर्मराज देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव सावळे, माजी जिल्हा परिषद सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, नागनाथराव घिसेवाड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे नगरसेवक साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, डॉ.उत्तमराव सोनकांबळे, संजय अंभोरे, शिवकुमार देशमुख, प्रल्हाद उमाटे, उपेंद्रसिंघ शाहू, रोहन कांबळे यांच्यासह परिवारातील सौ. प्रतिभाताई प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ.प्रमोद पाटील चिखलीकर संदीप पाटील चिखलीकर, प्रविण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



# गणेशोत्सवासाठी नांदेड पोलीस सज्ज

## जिल्ह्यात ४ हजारांहून अधिक पोलीस, एसआरपीएफसह अतिरिक्त कुमक तैनात

**नांदेड (प्रतिनिधी)** – गणेशोत्सव २०२६ जिल्ह्यात शांततेत, सुरक्षित व उत्साहात पार पडावा यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी व्यापक सुरक्षा नियोजन केले आहे. स्थानिक पोलीस बळासह पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त अतिरिक्त कुमकेची नियोजनबद्ध तैनाती करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस दलाच्या मनुष्यबळामध्ये पोलीस अधीक्षक -१, अपर पोलीस अधीक्षक -२, उपविभागीय पोलीस अधिकारी / डीवायएसपी -११, पोलीस निरीक्षक -३१, सहाय्यक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक -१८२, - पोलीस अंमलदार -२,६५७ यांचा समावेश आहे. तसेच बाहेरून प्राप्त अतिरिक्त मनुष्यबळामध्ये पोलीस उप अधीक्षक -२, पोलीस निरीक्षक -६, प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक -१०, महामार्ग पोलीस अंमलदार -५०, प्रशिक्षणार्थी अंमलदार (नागपूर व लातूर पीटीसी) -१०० (७५ पुरुष, २५ महिला), राज्य राखीव पोलीस बल (एसआरपीएफ) गडचिरोली -१ कंपनी, होमगार्ड - १,५७५ (१,३०० पुरुष, २७५ महिला) यांचा समावेश आहे.

या बंदोबस्तात गर्दीच्या ठिकाणी, मुख्य विसर्जन मार्गावर आणि प्रमुख गणेश मंडळांच्या ठिकाणी महिला पोलीस, २५ महिला प्रशिक्षणार्थी आणि २७५ महिला होमगार्ड यांच्यामार्फत विशेष लक्ष ठेवले जाणार आहे.

तसेच भाविकांची व वाहनांची गैरसोय होऊ नये म्हणून ५० महामार्ग पोलिसांसह स्थानिक वाहतूक शाखेकडून चोख नियमन केले जाईल. यासह एसआरपीएफ कंपनी, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील पेट्रोलिंग पथके, फिक्स पॉईंट आणि नाकाबंदीद्वारे २४ तास नजर ठेवली जाणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# डॉलरविरहित अर्थव्यवस्था?

नवी दिल्ली येथे झालेली ब्रिक्स परिषद ही केवळ उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या नेत्यांची बैठक राहिलेली नाही. अकरा सदस्य देशांचा समावेश असलेले हे व्यासपीठ आज जगाच्या जवळपास निम्म्या लोकसंख्येचे, जागतिक सकल उत्पादनाच्या सुमारे ४० टक्के आणि जागतिक व्यापाराच्या २६ टक्के वाट्याचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे ब्रिक्सचे वाढते महत्त्व केवळ आकडेवारीत नाही, तर जागतिक आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेला पर्याय देण्याच्या त्याच्या क्षमतेत आहे. भारताच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या परिषदेकडे म्हणूनच जगाचे लक्ष लागले आहे. भारताने निश्चित केलेली संकल्पना व्यापक आहे. अन्न आणि ऊर्जा सुरक्षा, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन, महत्त्वाच्या पुरवठा साखळ्या, व्यापार, गुंतवणूक, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विकासासाठी वित्तपुरवठा अशा विषयांवर चर्चा झाली आहे. हे विषय केवळ सरकारांच्या धोरणांपुरते मर्यादित नसून सामान्य नागरिकांच्या जीवनाशी थेट जोडलेले आहेत. महागाई, रोजगार, ऊर्जा उपलब्धता, तंत्रज्ञान आणि आर्थिक स्थैर्य यावर या चर्चांचा परिणाम होऊ शकतो. ब्रिक्सच्या विस्तारामुळे त्याची ताकद वाढली असली, तरी त्याचबरोबर आव्हानेही वाढली आहेत. विविध राजकीय व्यवस्था, परराष्ट्र धोरणे आणि आर्थिक हितसंबंध असलेल्या देशांना एका समान मंचावर आणणे सोपे नाही. त्यामुळे 'एकजूट' दाखविण्यापेक्षा व्यवहार्य सहकार्य निर्माण करणे हे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. स्थानिक चलनांमधील व्यापार, सीमापार डिजिटल पेमेंट व्यवस्था आणि न्यू डेव्हलपमेंट बँकेचा विस्तार यांसारख्या उपक्रमांमधून ब्रिक्स स्वतःची आर्थिक क्षमता प्रत्यक्षात सिद्ध करू शकतो. परिषदेला मात्र भूराजकीय संदर्भापासून दूर ठेवणे अशक्य होते. रशिया-युक्रेन युद्ध, मध्यपूर्वेतील संघर्ष, होर्मुझ सामुद्रधुनीची असुरक्षितता आणि अमेरिका-चीनसह विविध देशांमधील व्यापार तणाव यांचा परिणाम संपूर्ण जगावर होत आहे. ऊर्जा आणि अन्नधान्याच्या किमतींपासून वाहतूक आणि पुरवठा साखळीपर्यंत सर्वच क्षेत्रे या संकटांनी प्रभावित झाली आहेत. त्यामुळे विकासाच्या प्रश्नांवर चर्चा करताना जागतिक संघर्षांकडे डोळेझाक करणे ब्रिक्ससारख्या प्रभावी मंचाला परवडणारे नाही. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची उपस्थिती या परिषदेला विशेष राजकीय महत्त्व देणारी आहे. भारत आणि चीनमधील संबंधांमध्ये अद्यापही धोरणात्मक अविश्वासाची छाया आहे. अशा परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दोन्ही नेत्यांशी झालेली चर्चा महत्त्वाची ठरते. भारताने एका बाजूला रशिया आणि चीनशी संवाद कायम ठेवताना दुसऱ्या बाजूला अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांशीही मजबूत संबंध राखले आहेत. हीच भारताची स्वतंत्र आणि संतुलित परराष्ट्र धोरणाची कसोटी आहे. ब्रिक्सला पाश्चिमात्यविरोधी आघाडी बनविण्याचा प्रयत्न करणे भारतासाठीही योग्य ठरणार नाही. 'डॉलरविरहित अर्थव्यवस्था' हा औपचारिक अजेंडा नसल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. मात्र जागतिक आर्थिक व्यवहारांमध्ये विकसनशील देशांना अधिक स्वायत्तता मिळावी, त्यांच्या चलनांना आणि वित्तीय संस्थांना अधिक महत्त्व मिळावे, ही मागणी निश्चितच रास्त आहे. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि संयुक्त राष्ट्रसंघासारख्या संस्थांमध्ये आजच्या आर्थिक वास्तवाचे अधिक प्रतिनिधित्व दिसले पाहिजे. खरा प्रश्न असा आहे की, ब्रिक्स केवळ 'नव्या जागतिक व्यवस्थे'च्या घोषणा करणार की त्या दिशेने ठोस संस्थात्मक पावले उचलणार? व्यापारातील अडथळे कमी करणे, तंत्रज्ञानाची देवाणघेवाण वाढविणे, विकासशील देशांना स्वस्त वित्तपुरवठा उपलब्ध करून देणे, डिजिटल पेमेंटची सक्षम व्यवस्था उभारणे आणि संकटाच्या काळात परस्पर सहकार्याची यंत्रणा विकसित करणे, हीच ब्रिक्सची खरी परीक्षा आहे. भारताकडे या परिषदेत नेतृत्वाची ऐतिहासिक संधी आहे. विस्तारलेल्या ब्रिक्सला कोणत्याही एका देशाच्या राजकीय प्रभावाखाली न ठेवता समान हितसंबंधांच्या आधारावर पुढे नेणे आवश्यक आहे. जगाला संघर्षाच्या नव्हे, सहकार्याच्या नव्या चौकटीची गरज आहे. दिल्लीतील ब्रिक्स परिषद ही केवळ शक्तिप्रदर्शनाची संधी न ठरता, जागतिक दक्षिणेच्या आकांक्षांना संस्थात्मक बळ देणारा टप्पा ठरली पाहिजे. घोषणांच्या पलीकडे जाऊन व्यवहार्य पर्याय उभे करण्यात भारत यशस्वी झाला, तर दिल्लीतील ब्रिक्स परिषद इतिहासातील आणखी एक शिखर परिषद न राहता नव्या बहुध्रुवीय जगाच्या पायाभरणीचा निर्णायक क्षण ठरेल.

# विश्वेश्वरय्यांनी दाखवलेल्या पायवाटेवर भारताची विकासयात्रा



१५ सप्टेंबर दिन हा भारतात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा हा दिवस केवळ अभियंत्यांचा गौरव करण्याचा दिवस नाही, तर विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्याच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

१५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील मुद्देनहळ्ळी येथे जन्मलेल्या विश्वेश्वरय्यांनी अत्यंत साध्या परिस्थितीतून शिक्षण घेत अभियांत्रिकी क्षेत्रात असामान्य कामगिरी केली. पाणी व्यवस्थापन, सिंचन, पूरनियंत्रण आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात त्यांनी केलेले काम त्यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे.

पुण्याजवळील खडकवासला जलाशयासाठी त्यांनी विकसित केलेली स्वयंचलित जलद्वारांची अभिनव यंत्रणा ही त्या काळातील अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना होती. पुढे त्यांच्या तांत्रिक विचारांचा उपयोग इतर धरणे आणि जलप्रकल्पांतही झाला. म्हैसूरमधील कृष्णराज सागर धरण, हैदराबादमधील पूरनियंत्रण व्यवस्था आणि विशाखापट्टणम बंदराच्या संरक्षणासाठी केलेले कार्य त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देते.

मात्र विश्वेश्वरय्यांचे मोठेपण केवळ धरणे बांधण्यात नव्हते. अभियांत्रिकीचा उपयोग उद्योग, रोजगार आणि आर्थिक विकासासाठी झाला पाहिजे, असा त्यांचा ठाम विचार होता. म्हैसूरचे दिवाण म्हणून त्यांनी भद्रावती आयर्न अँड स्टील प्लांट, म्हैसूर सोप फॅक्टरी, स्टेट बँक ऑफ म्हैसूर यांसारख्या संस्थांच्या उभारणीला चालना दिली. स्वातंत्र्यपूर्व काळातच त्यांनी भारताच्या औद्योगिकीकरणाची गरज ओळखली होती. त्या पायवाटेवरून आज भारत ज्या वेगाने प्रगती करत आहे, त्याच्या मुळाशी विश्वेश्वरय्यांसारख्या दूरदृष्टीच्या राष्ट्रनिर्मात्यांनी रुजवलेली विज्ञाननिष्ठा, नियोजन आणि नवकल्पनांची संस्कृती आहे.

धरणे, महामार्ग, रेल्वे, मेट्रो, डिजिटल पायाभूत सुविधा, आधुनिक शहरे, अक्षय ऊर्जा, अंतराळ संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि अत्याधुनिक उत्पादन क्षेत्रापर्यंत भारतीय अभियंते आज देशाच्या विकासाला गती देत आहेत. भारताच्या अभियांत्रिकी क्षेत्राने आता देशाच्या सीमा ओलांडून जागतिक पातळीवर आपली क्षमता सिद्ध केली आहे. केंद्र सरकारच्या माहितीनुसार भारतात जगातील सुमारे २० टक्के चिप-डिझाइन अभियंते आहेत आणि कृत्रिम बुद्धिमत्ता कौशल्याच्या बाबतीतही भारताची जागतिक उपस्थिती मजबूत आहे.

जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रातही त्यांचा वारसा आजच्या भारतात जाणवतो. आज देशात हजारो मोठी धरणे, शेती, पिण्याचे पाणी, वीज निर्मिती आणि पूरनियंत्रणासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने धरणांच्या सुरक्षिततेचे निरीक्षण आणि व्यवस्थापन केले जात आहे.

**आजच्या पिढीने काय शिकावे?**

विश्वेश्वरय्यांचे जीवन आजच्या तरुणांसाठी मोठी प्रेरणा आहे. त्यांनी पदवीला केवळ नोकरीचे साधन मानले नाही; ज्ञानाचा उपयोग समाज आणि राष्ट्राच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी केला.

आजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून तीन गोष्टी शिकण्याची गरज आहे. ज्ञानासाठी जिज्ञासा, कामात शिस्त आणि देशासाठी योगदान देण्याची भावना.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, अंतराळ तंत्रज्ञान आणि डिजिटल क्रांतीचा काळ आहे. त्यामुळे पुढील विश्वेश्वरय्या कोण असेल, हा प्रश्न महत्त्वाचा नाही; आजच्या पिढीतून किती विश्वेश्वरय्या घडतील, हा खरा प्रश्न आहे. विश्वेश्वरय्यांनी ज्या पायवाटेवरून भारताला आधुनिकतेची दिशा दाखवली, त्याच पायवाटेवरून आजचा भारत विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहत आहे. अभियंता दिनाचा खरा संदेश हाच पूल, धरणे आणि इमारती बांधण्यापेक्षा मोठे काम म्हणजे देशाचे भविष्य बांधणे.

विश्वेश्वरय्यांना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याबरोबरच त्यांच्या दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, शिस्त, नवकल्पना आणि राष्ट्रसेवेची भावना पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे होय.

**-ॲड. संजय रुईकर**
सचिव
आरसीएमटी ग्रुप ऑफ
इन्स्टिट्यूशन्स विष्णुपुरी, नांदेड
मो. ९२२५७५०१३८

# अभियांत्रिकीचे नवे युग : मानवतेस आकार देणाऱ्या क्रांतिकारी नवकल्पना

आजचे युग वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचे आहे. अभियांत्रिकी म्हटले की पूर्वी पूल, रस्ते, इमारती, धरणे किंवा पारंपरिक यंत्रसामग्री एवढेच चित्र डोळ्यांसमोर उभे राहत असे. मात्र, आता अभियांत्रिकीची व्याप्ती त्यापलीकडे गेली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान, अंतराळ तंत्रज्ञान, नॅनो-तंत्रज्ञान आणि शून्य-कार्बन तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत अभियंते नवनवीन प्रयोग करत आहेत. आजचा अभियंता केवळ काहीतरी निर्माण करणारा तंत्रज्ञ राहिलेला नाही; तर मानवाचे जीवन अधिक सुरक्षित, सुलभ आणि शाश्वत बनविण्यासोबतच पृथ्वीच्या भवितव्याचे रक्षण करणारा नवोन्मेषक म्हणून त्याची भूमिका विकसित होत आहे. भारतामध्ये दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस महान अभियंता आणि भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त ङअभियंता दिनफ म्हणून साजरा केला जातो. देशाच्या विकासात अभियंत्यांचे योगदान, त्यांची कल्पकता, संशोधनवृत्ती आणि अथक परिश्रम यांचा गौरव करण्याचा हा दिवस आहे. या निमित्ताने अभियांत्रिकी क्षेत्रात आकार घेत असलेल्या काही भविष्यवेधी तंत्रज्ञानांकडे नजर टाकूया.

**स्ट्रक्चरल बॅटरी कंपोझिट्स :**
**वाहनाची बॉडीच बनेल बॅटरी!**

इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरासमोर सर्वांत मोठे आव्हान आहे ते बॅटरीचे वजन. मोठ्या बॅटरीमुळे वाहनाचे वजन वाढते आणि त्याचा कार्यक्षमतेवर परिणाम होतो. या समस्येवर उपाय म्हणून ङस्ट्रक्चरल बॅटरीफ ही संकल्पना पुढे आली आहे. या तंत्रज्ञानामध्ये वाहनाच्या काही संरचनात्मक भागांमध्येच ऊर्जा साठविण्याची क्षमता निर्माण केली जाते. उदाहरणार्थ, कारचे छत, दरवाजे किंवा अन्य संरचनात्मक भाग बॅटरीसारखे कार्य करू शकतात. कार्बन फायबरसारखे मजबूत आणि हलके पदार्थ संरचनेला मजबुती देतानाच ऊर्जा साठविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होतात. यामुळे स्वतंत्र आणि जड बॅटरी पॅकवरील अवलंबित्व कमी होऊ शकते. परिणामी, इलेक्ट्रिक वाहनांचे वजन कमी होऊन त्यांची कार्यक्षमता आणि प्रवासक्षमता वाढण्याची शक्यता आहे. भविष्यात विमान, स्मार्टफोन आणि अन्य हलक्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्येही या तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो.




**क्वांटम कॉम्प्युटिंग : संगणकांच्या क्षमतेला नवे क्षितिज**

पारंपरिक संगणकांमध्ये माहितीचे प्रतिनिधित्व ङबिटफच्या माध्यमातून ० किंवा १ अशा दोन स्थितींमध्ये केले जाते. मात्र, क्वांटम संगणकांमध्ये ङक्यूबिटफ या एककाचा वापर होतो. क्वांटम भौतिकशास्त्रातील सुपरपोझिशनसारख्या तत्त्वांमुळे क्यूबिट्स विशिष्ट परिस्थितीत एकापेक्षा अधिक स्थितींचे प्रतिनिधित्व करू शकतात. त्यामुळे काही प्रकारच्या अत्यंत गुंतागुंतीच्या गणना पारंपरिक संगणकांच्या तुलनेत वेगळ्या पद्धतीने आणि अधिक कार्यक्षमतेने सोडविण्याची क्षमता क्वांटम संगणकांमध्ये आहे. क्यूबिट्स अत्यंत संवेदनशील असल्यामुळे त्यांना स्थिर ठेवण्यासाठी नियंत्रित वातावरण आणि अनेकदा अत्यंत कमी तापमानाची आवश्यकता असते. त्यासाठी क्रायोजेनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. औषधनिर्मिती, नवीन पदार्थांचा शोध, हवामान मॉडेलिंग, क्रिप्टोग्राफी आणि गुंतागुंतीच्या वैज्ञानिक गणनांमध्ये भविष्यात क्वांटम कॉम्प्युटिंगचा मोठा प्रभाव पडू शकतो.

**बायोहायब्रिड रोबोटिक्स :**
**यंत्रात जीवशास्त्राचा संगम**

रोबोट म्हटले की धातू, प्लास्टिक आणि इलेक्ट्रॉनिक भागांनी बनलेली यंत्रे आपल्या डोळ्यांसमोर येतात. मात्र, बायोहायब्रिड रोबोटिक्स ही संकल्पना या पारंपरिक कल्पनेलाच आव्हान देत आहे. या तंत्रज्ञानात यांत्रिक संरचनेसह जिवंत पेशींचाही वापर केला जातो. प्रयोगशाळेत विकसित केलेल्या स्नायूंच्या पेशी कृत्रिम सांगाड्यावर बसवून त्यांना विद्युत किंवा प्रकाशाच्या संकेतांनी नियंत्रित करण्याचे प्रयोग सुरू आहेत. जिवंत स्नायूंच्या नैसर्गिक आकुंचन-प्रसरणाचा उपयोग केल्यामुळे अतिशय सूक्ष्म आणि लवचिक हालचाली करणारे रोबोट विकसित करण्याची शक्यता आहे. विशेषतः वैद्यकीय क्षेत्रात या तंत्रज्ञानाला मोठी क्षमता आहे. भविष्यात शरीराच्या अतिशय सूक्ष्म भागांपर्यंत पोहोचणे, औषधांचा लक्ष्यित पुरवठा करणे किंवा विशिष्ट वैद्यकीय प्रक्रियांमध्ये मदत करणे यासाठी सूक्ष्म बायोहायब्रिड रोबोट उपयोगी ठरू शकतात.

**डिजिटल ट्विन्स : प्रत्यक्ष**
**बांधकामापूर्वी आभासी चाचणी**

मोठी इमारत, पूल, कारखाना किंवा संपूर्ण स्मार्ट सिटी उभारण्यापूर्वीच त्याची डिजिटल प्रतिकृती तयार करून त्यावर विविध परिस्थितींची चाचणी घेता आली तर? ङडिजिटल ट्विनफ तंत्रज्ञान हेच शक्य करून दाखवते. या तंत्रज्ञानात प्रत्यक्ष प्रकल्पाची सविस्तर डिजिटल प्रतिकृती तयार केली जाते. त्यानंतर या आभासी मॉडेलवर भूकंप, चक्रीवादळ, अतिउष्णता, पाण्याचा ताण किंवा इतर संभाव्य परिस्थितींचे सिम्युलेशन करता येते. कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्यामुळे हजारो संभाव्य परिस्थितींचे विश्लेषण करून डिझाइनमधील त्रुटी किंवा धोके प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्यापूर्वीच ओळखता येऊ शकतात. यामुळे सुरक्षितता वाढविणे, खर्च कमी करणे, वेळ वाचविणे आणि प्रकल्पाची कार्यक्षमता वाढविणे शक्य होऊ शकते.

**अंतराळातील कचरा : आता र**
**ोबोट करतील स्वच्छता!**

अंतराळात कार्यरत असलेल्या उपग्रहांची संख्या वाढत असताना जुन्या उपग्रहांचे अवशेष, रॉकेटचे तुकडे आणि इतर वस्तूंचे प्रमाणही वाढत आहे. या अंतराळातील कचऱ्यामुळे कार्यरत उपग्रह आणि अंतराळयानांना गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच अंतराळातील कचरा ओळखणे, त्याचा मागोवा घेणे आणि सुरक्षितपणे हटविणे यासाठी विविध तंत्रज्ञान विकसित केले जात आहे. रोबोटिक यंत्रणा, पकडणारे यांत्रिक हात, जाळ्यासारख्या प्रणाली आणि लेझर-आधारित मार्गदर्शन तंत्रज्ञानाचा वापर करून कक्षेत फिरणाऱ्या अवशेषांवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात अंतराळातील कचरा नियंत्रित करण्यासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविल्या गेल्यास उपग्रहांचे संरक्षण आणि अंतराळ मोहिमांची सुरक्षितता वाढण्यास मदत होऊ शकते.

**सेल्फ-हीलिंग काँक्रीट : भेगा पडल्या**
**तरी काँक्रीट स्वतःच दुरुस्त होणार!**

रस्ते, पूल, धरणे आणि इमारतींच्या देखभालीतील मोठी समस्या म्हणजे काँक्रीटमध्ये कालांतराने निर्माण होणाऱ्या भेगा. सुरुवातीला या भेगा लहान असल्या तरी त्यातून पाणी आत शिरल्यास संरचनेचे नुकसान वाढू शकते. या समस्येवर उपाय म्हणून अभियंते ङसेल्फ-हीलिंग काँक्रीटफ विकसित करण्यावर काम करत आहेत. या तंत्रज्ञानात काँक्रीटमध्ये विशिष्ट जीवाणू आणि त्यांना आवश्यक पोषक घटक सूक्ष्म कॅप्सूलच्या स्वरूपात मिसळले जातात. काँक्रीटमध्ये भेग निर्माण होऊन त्यात पाणी प्रवेश केल्यानंतर काही विशिष्ट जीवाणू सक्रिय होतात. त्यांच्या जैविक प्रक्रियेतून चुनखडीसारखा पदार्थ तयार होऊन भेग भरून येण्यास मदत होते. या तंत्रज्ञानामुळे काँक्रीटची टिकाऊपणा वाढविणे आणि वारंवार करावी लागणारी दुरुस्ती कमी करणे शक्य होऊ शकते. भविष्यात पायाभूत सुविधांच्या देखभाल खर्चातही मोठी बचत होण्याची अपेक्षा आहे.

**अभियंता : केवळ निर्माता नव्हे,**
**तर भविष्याचा शिल्पकार!**

अंतराळातील कचरा हटविणाऱ्या रोबोटपासून स्वतःच्या भेगा भरून घेणाऱ्या काँक्रीटपर्यंत आणि क्वांटम संगणकांपासून जिवंत पेशींचा वापर करणाऱ्या रोबोटपर्यंतअभियांत्रिकीची वाटचाल आज अभूतपूर्व वेगाने होत आहे. सर एम. विश्वेश्वरय्या यांनी विकासाच्या ज्या दूरदृष्टीची पायाभरणी केली, तिचा विस्तार आजची अभियंत्यांची पिढी अंतराळापासून सूक्ष्म जैविक जगापर्यंत करत आहे. अभियांत्रिकी म्हणजे केवळ यंत्रे आणि इमारती उभारणे नाही; तर भविष्यातील जग अधिक सुरक्षित, सक्षम, पर्यावरणपूरक आणि मानवी जीवनासाठी उपयुक्त बनविण्याची जबाबदारी आहे. म्हणूनच आजचा अभियंता हा केवळ निर्माता नाही, तर नवकल्पनांचा शिल्पकार आणि मानवतेच्या उज्ज्वल भवितव्याचा रक्षक आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# एआयच्या पडद्यावर ८० चे दशक आणि त्याचे दुष्परिणाम...

सध्या सोशल मीडियावर एक भन्नाट लाट आली आहे. लोक आपले आजचे फोटो एआयच्या हवाली करतात आणि सांगतात, मला १९८० च्या दशकातला दाखव. पुढच्या काही क्षणांत एआय आपल्याला चक्क ऐंशीच्या दशकात नेऊन उभे करते.

केसांची हिप्पी स्टाईल, मोठे गॉगल, रंगीबेरंगी कपडे, जॅकेट, रुंद कॉलर, हातात घड्याळ आणि मागे जुन्या काळाची पार्श्वभूमी... त्यावर जुन्या फिल्मसारखा दाणेदार पोत. फोटो पाहताना क्षणभर स्वतःलाच प्रश्न पडतो, आपण एवढे देखणे होतो का? आणि लगेच दुसरा प्रश्न, की एआयने आपल्यावर जरा जास्तच मेहरबानी केली?

हा ट्रेंड केवळ फोटो बदलण्याचा नाही, तर आठवणी जाग्या करण्याचा आहे. ज्यांनी ऐंशीचे दशक प्रत्यक्ष अनुभवले, त्यांना या फोटोत आपला भूतकाळ दिसतो. ज्यांचा त्या काळाशी जन्मानेही संबंध नाही, त्यांना मात्र एआय एक काल्पनिक भूतकाळ देत आहे.

खरे तर यामागे एआयपेक्षा माणसाचे मन मोठे कारण आहे. भूतकाळाबद्दलची ओढ, जुन्या आठवणी, माणसाला आपल्या आयुष्याशी, नात्यांशी आणि जुन्या अनुभवांशी पुन्हा जोडतात. म्हणूनच एआयने तयार केलेला एक फोटोही आपल्याला एखाद्या जुन्या मित्राची, घराच्या ओसरीची, शाळेची किंवा एखाद्या गाण्याची आठवण करून देतो.

**ते दिवसच वेगळे होते...**

१९८० चे दशक म्हणजे आजच्या डिजिटल जगापेक्षा अगदी वेगळे जग.

घरात दूरदर्शन असणे हीच मोठी गोष्ट होती. रविवारी सकाळी रामायण पाहण्यासाठी रस्ते ओस पडायचे. ऑडीओ कॅसेट होत्या, आताच्या सारखी म्युझिक स्ट्रीमिंग नव्हते. व्हीडीओ कॅसेट होती, ओटीटी नव्हते. लँडलाइन फोन होता, मोबाईल नव्हता. पत्र लिहिले जायचे, इन्स्टंट मेसेज नव्हते.

आज मेसेजला पाच मिनिटे उत्तर मिळाले नाही तरी चिंता सुरू होते. त्या काळात पत्राचे उत्तर पंधरा दिवसांनी आले तरी नात्यांवरचा विश्वास कायम असायचा. त्या काळची फॅशनही तितकीच भन्नाट होती. अमिताभ बच्चन यांचा 'अँग्री यंग मॅन' असो, धर्मेंद्रचा रुबाब, मिथुन चक्रवर्तीचा नृत्याचा जलवा, अनिल कपूरची तरुणाई किंवा विनोद खन्ना यांचा देखणा अंदाज पडद्यावरचा हिरो म्हणजे तरुणाईचा फॅशन आयकॉन.




श्रीदेवी, रेखा, हेमा मालिनी, जयाप्रदा आणि पुढे माधुरी दीक्षित यांच्या केशरचना, वेशभूषा आणि देहबोलीचीही नक्कल केली जायची.

आज सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर फॅशन ठरवतात तेव्हा चित्रपटातील हिरो-हिरोईन फॅशन ठरवत होते.

मोठे कॉलर, भडक रंग, रुंद पँट, डेनिम, जॅकेट, मोठे गॉगल, ठसठशीत घड्याळे आणि भरपूर केस हीच ऐंशीच्या दशकाची दृश्यभाषा, आणि आज एआयने हीच दृश्यभाषा पुन्हा जिवंत केली आहे.

**पण या गंमतीची**
**एक गंभीर बाजूही आहे...**

आपण एआयच्या एखाद्या साधनावर आपला फोटो अपलोड करतो, तेव्हा आपण केवळ एक फोटो देत नसतो. त्यातून आपला चेहरा, ओळखण्याजोगी वैशिष्ट्ये आणि कधी कधी पार्श्वभूमीतील घर, कार्यालय किंवा इतर माहितीही त्या व्यासपीठापर्यंत पोहोचू शकते. म्हणून फोटो अपलोड करण्यापूर्वी त्या एआय सेवेची प्रायव्हसी पॉलिसी वाचणे महत्त्वाचे आहे.

फोटो किती काळ जतन केला जातो? त्याचा वापर कशासाठी होतो? तो एआय प्रशिक्षणासाठी वापरला जातो का? फोटो हटवल्यानंतर तो खरोखरच सर्व्हरवरून हटतो का? हे प्रश्न कोणाला पडले का हा मोठा विषय आहे.

एआय आपल्याला १९८५ मध्ये घेऊन जाऊ शकतो, पण आपला डिजिटल डेटा पुन्हा १९८५ मध्ये घेऊन जाऊ शकत नाही. म्हणून व्हायरल होण्याच्या नादात आपण आपला चेहरा, कुटुंब आणि खासगी आयुष्य अनोळखी व्यासपीठांच्या ताब्यात तर देत नाही ना, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. शेवटी, या ट्रेंडचा आनंद घेण्यात काहीच गैर नाही. एखादा एआय फोटो आपल्याला क्षणभर थांबवतो, जुन्या मित्रांची आठवण करून देतो, एखादे जुने गाणे कानात घुमवतो आणि मनाला पुन्हा त्या काळात घेऊन जातो.

**फक्त एवढीच काळजी...**

एआयने आपल्याला ऐंशीच्या दशकातला हिरो दाखवला म्हणून तो खरा समजू नये, आणि त्या फोटोला भरपूर लाईक्स मिळाले म्हणून स्वतःला अमिताभ बच्चनचा भाऊ समजू नये. आठवणी जपाव्यात, पण डेटा जपून...

**-विलास भीमराव कोळी**
पुणे
मो. ९७६३०८४४९९

# विद्यापीठाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रस्तावांना अधिसभेच्या बैठकीत मंजुरी

## संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विकासाला गती देणारे विविध महत्त्वपूर्ण प्रस्ताव चर्चेनंतर अधिसभेच्या बैठकीत सर्वानुमते मंजूर करण्यात आले. विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे विद्यापीठ परिसरात स्मारक उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्तावही या बैठकीत मंजूर करण्यात आला.

विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक दि.१२ सप्टेंबर, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी व्यासपीठावर कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. बी. एस. सुरवसे, डॉ. माधव गव्हाणे, डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. संतराम मुंढे, नरेंद्र चव्हाण, नारायण चौधरी, हनमंत कंधारकर, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. सुरेखा भोसले, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांची प्रमुख उपस्थित होती. वंदे मातरम् गीताने बैठकीस प्रारंभ झाला.

बैठकीच्या प्रारंभी अधिसभेवर नव्याने नियुक्त झालेल्या सदस्यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. यामध्ये आमदार बाबुराव कदम कोळहळीकर, प्राचार्य डॉ. अवधूत शिंदे, प्राचार्य डॉ. बालाजी ढाकणे आणि नगरसेविका कोमाताई आळसे यांचा समावेश होता.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या प्रास्ताविकानंतर विद्यापीठाच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. काही महात्ताच्या दुरुस्तीसह विद्यापीठाच्या सन २०२५-२६ च्या लेखा अंकेक्षनास मंजुरी देण्यात आली.

अधिसभा सदस्य डॉ. अशोक मोटे यांनी विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे विद्यापीठ परिसरात स्मारक उभारण्यात यावे, असा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडला. या स्मारकामध्ये डॉ. वाघमारे यांचा पुतळा, संग्रहालय, वाचनालय तसेच त्यांच्या कार्याची माहिती देणारे विविध उपक्रम असावेत, अशी भूमिका मांडण्यात आली. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन त्याच्या अंमलबजावणीसाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना सर्वाधिकार देण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करून स्मारक उभारणीची कार्यवाही करण्यात यावी, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

अधिसभा सदस्य डॉ. अविनाश शिंदे यांनी विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य व प्राध्यापकांची भरती करण्यात यावी, असा प्रस्ताव मांडला. डॉ. विजय भोपाळे यांनी अधिसभेत मंजूर होणाऱ्या ठरावांची माहिती संबंधित घटकांना मिळावी तसेच आवश्यक मंजुरीनंतर अधिसभेचे इतिवृत्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला. दोन्ही प्रस्तावांना मान्यता देण्यात आली.

डॉ. महेश मगर यांनी विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र विश्रांती कक्षाची व्यवस्था करण्यात यावी, असा प्रस्ताव मांडला. तोही सर्वानुमते मंजूर करण्यात आला. धनराज जोशी यांनी सर्व प्राधिकरणांची आवश्यक प्रक्रिया वेळेत सुरू करून १ सप्टेंबर, २०२७ पूर्वी गठित करण्याबाबत प्रस्ताव मांडला. या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली.

डॉ. दीपक बचेवार यांनी सिंह सभागृहातील खुर्च्या लवकरात लवकर बदलण्यात याव्यात, असा प्रस्ताव मांडला. त्यास मंजुरी देण्यात आली. महाविद्यालयीन शिक्षकांसाठी एआय, नवीन तंत्रज्ञान आणि बदलत्या अध्यापन पद्धतींबाबत विद्यापीठ स्तरावर नियमित प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे, असा प्रस्ताव डॉ. अशोक ट्रिपलसे यांनी मांडला. या प्रस्तावालाही अधिसभेने सर्वानुमते मंजुरी दिली.

याशिवाय डॉ. दीपक मोरताळे, डॉ. संजय वाघमारे, डॉ. अशोक गुजराती, डॉ. वर्षा डोडिया, ड. सिद्धेश्वर कासनाळे, डॉ. विनोद माने, मुरलीधर जायभाय, डॉ. महेश बेंबडे, शिवाजी चांदणे, डॉ. विष्णू पवार, रंगनाथ शेळके, डॉ. दिलीपकुमार बोईनवाड आणि डॉ. रामेश्वर पवार यांनी विद्यापीठाच्या विकासासंदर्भात विविध प्रस्ताव मांडले. या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# लोह्यातील क्रीडा संकुलासाठी ३ कोटी, अभ्यासिकेसाठी ५० लाख -आ. चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा-कंधार मतदारसंघाचे नेते आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या भागातील विद्यार्थ्यांना दूरगामी उपयुक्त ठरणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. गणेशोत्सव मुहूर्तावर आ. चिखलीकरांची तरुणाईला ३ कोटी ५० लक्ष रुपयांची गिफ्ट जाहीर केली त्यातून लोह्यात क्रीडा संकुल आणि नगर पालिकेच्या वतीने अद्ययावत अभ्यासिका साकारणार आहे.



आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी निवडणूक काळात युवकांना पोलीस, सैन्य, निमलष्करी दल, पीएसआय व अन्य भरतीसाठी मैदानी तयारी करणाऱ्या आवश्यक मैदान आणि अभ्यासासाठी अद्ययावत सुविधा व स्पर्धा परीक्षेची पुस्तके उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर पहिल्या टप्प्यात लोहा शहरातील क्रीडा संकुलासाठी ३ कोटी व नगर परिषदेच्या नवीन अभ्यासिकेसाठी ५० लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा आमदार महोदयांनी शहरातील 'दही हंडी' कार्यक्रमात केली. त्याचे तरुणाईने जल्लोषात स्वागत केले. झेन-जी'च्या संकल्पना व त्यांच्या अपेक्षांवर लक्ष केंद्रित करत आ. चिखलीकर हे मतदारसंघातील खेड्यापाड्यातील, वाडी-तांड्यावरील युवक-युवतींनी मोठ्या पदावर पोहोचावे, विविध परीक्षांमध्ये यश मिळवावे यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात.

लोहा व कंधार शहरातील क्रीडा संकुलात अद्ययावत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी मागील काही महिन्यांपासून त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. कंधार येथील क्रीडा संकुलाचा प्रश्न मार्गी लागला असून, लोह्यात नगरसेवक अविनाश पाटील यांनी आयोजित केलेल्या दही-हंडी कार्यक्रमात बोलताना त्यांनी थेट युवकांशी संवाद साधला. शहराजवळील बेरळी फाट्यालगत असलेल्या क्रीडा संकुलात अद्ययावत धावण्याचा ट्रॅकसह अन्य क्रीडा सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. मागील तीन महिन्यांपूर्वी पोलीस, सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या मुला-मुलींच्या मागणीनंतर तेथे तात्पुरता धावण्याचा ट्रॅक तयार करून देण्यात आला होता, त्याचा मोठा फायदा विद्यार्थ्यांना झाला.

नगरपालिकेच्या वतीने नव्याने अद्ययावत अभ्यासिका उभारण्याचा संकल्प त्यांनी निवडणूक काळात जाहीर केला होता, त्याची पूर्तता करत अभ्यासिकेसाठी ५० लाख रुपये जाहीर केले. अशा प्रकारे गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर त्यांनी साडेतीन कोटी रुपयांच्या विकासकामांची गिफ्ट जाहीर केली. अभ्यासिका व क्रीडा संकुलातील सुविधेचा फायदा पोलीस भरती, सैन्य व अन्य भरतीची तयारी करणाऱ्या शहर व परिसरातील विद्यार्थ्यांना होणार असून, या निर्णयाचे तरुणांनी स्वागत केले आहे.

याप्रसंगी जिल्हा बँकेच्या संचालिका प्रणिताताई देवरे-चिखलीकर, युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, सचिन पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, दिनेश तेललावार, सतीश निखाडे, केतन खिल्लारे, तुकाराम दाढेल, राजेश बोडके, सचिन मुकदम, शहाजी पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कुणबी-मराठा प्रमाणपत्रासाठी रामतीर्थ येथे १६ सप्टेंबरला विशेष नोंदणी शिबीर

## पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे महसूल प्रशासनाचे आवाहन

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ व गतिमान करण्यासाठी १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच अनुषंगाने बिलोली तालुक्यातील रामतीर्थ महसूल मंडळात बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता विशेष नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये रामतीर्थ महसूल मंडळातील पात्र मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा समाजातील नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करता येणार आहे. जात प्रमाणपत्राची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने महसूल मंडळ स्तरावर ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पात्र नागरिकांनी शिबिरास येताना जुने महसुली पुरावे, उपलब्ध जात नोंदी, फेरफार नोंदी, जन्म-मृत्यूच्या जुन्या नोंदी, आधारकार्ड व अन्य ओळखपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, खासरा पत्रक तसेच उपलब्ध असलेली इतर संबंधित कागदपत्रे सोबत आणावीत, असे महसूल प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

रामतीर्थ महसूल मंडळातील पात्र नागरिकांनी या विशेष शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार गजानन शिंदे, मंडळ अधिकारी कल्पना मुंडकर आणि तलाठी विजय पाटील जाधव यांनी केले आहे.

# मोबाईल व्यसनाधिनते संदर्भात जनजागृती



**नांदेड (प्रतिनिधी)–** आसरा नगर येथील आयुष्मान आरोग्यवर्धिनी केंद्रात बालके व पालकांसाठी 'मोबाईल व्यसनाधीनता' या विषयावर विशेष जनजागृती करण्यात आली.

या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. उमेश आत्राम उपस्थित होते. त्यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम, मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्याचे मार्ग आणि नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करावा, यावर पालकांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. मुंगल, डॉ. सुरेखा मुंगल आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. रीठे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. जयश्री आढाव, विलास गाडे, मोहम्मद सय्यद, नागेश पारवे, प्रमिला राऊत, सुकेशनी वने, माधवी रेड्डी, लता वीरभद्रे, निर्मलाताई नरवाडे आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळावे

## डॉ. महेंद्र ढवळे यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** कमी पावसाच्या परिस्थितीतही चांगले व शाश्वत उत्पन्न मिळवून देणाऱ्या रेशीम शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे, असे आवाहन प्रादेशिक रेशीम कार्यालयाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे यांनी केले.

'मेरा रेशीम, मेरा अभिमान' या उपक्रमांतर्गत सांगवी (क) येथे आयोजित रेशीम शेती कार्यशाळेत ते बोलत होते. पावसाचे प्रमाण कमी होत असताना पारंपरिक शेतीला पर्याय म्हणून रेशीम शेती उपयुक्त ठरू शकते. कमी पाण्यात उत्पादन घेता येत असल्याने शेतकऱ्यांनी या व्यवसायाचा गांभीर्याने विचार करावा, असे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

जिल्हा रेशीम अधिकारी अशोक वडवळे यांनी रेशीम शेतीच्या आर्थिक फायद्यांची माहिती दिली. योग्य नियोजन व व्यवस्थापनातून प्रति एकर एक ते दोन लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत तुती लागवडीसाठी ४५ हजार रुपये, तर कीटक संगोपन गृहासाठी २ लाख ४३ हजार रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली.

केंद्रीय रेशीम मंडळाच्या वैज्ञानिक बी डॉ. अंतरा गुप्ता यांनी रेशीम शेतीतील तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. उत्पादनादरम्यान येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी विभागाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

तालुका कृषी अधिकारी सोनकांबळे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत प्राप्त प्रस्तावांना लवकर मान्यता देऊन अनुदान वितरणाची प्रक्रिया गतिमान करण्याचे आश्वासन दिले.

कार्यशाळेस रेशीम कार्यालयाच्या क्षेत्र सहायक कांचन जाधव, अमर सूर्यवंशी, नरोजी कोरके, कृषी विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नांदेड जिल्ह्याच्या कर्नाटक सीमेलगतच्या भागातील शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन मार्गदर्शन केल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने मनमत काळे यांनी रेशीम विभागाचे आभार मानले.

# 'एमजीएम'च्या विद्यार्थ्यांनी विकसित केली कार्बन न्यूट्रल स्मार्ट कुलींग प्रणाली



**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग नांदेड येथील अंतिम वर्षांतील स्थापत्य अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी कार्बन न्यूट्रल कन्स्ट्रक्शन ॲन्ड ग्रीन बिल्डिंग या विषयावर आधारित एक नाविन्यपूर्ण व पर्यावरणपुरक प्रकल्प विकसित केला आहे.

सध्याच्या पारंपरिक वातानुकुलीत सिस्टीममध्ये मोठ्या प्रमाणात वीज वापरली जाते, यातील उत्सर्जित हवेमुळे पर्यावरणाची झीज होते. याला पर्याय म्हणून विद्यार्थ्यांनी सौर-ऊर्जेवर चालणारी, सेन्सर आधारित स्वयंचलित कुलिंग सिस्टीम विकसित केली आहे. सेन्सारच्या मदतीने ही सिस्टीम तापमान व आर्द्रता तपासून आवशकतेनुसार कार्य करते. यामुळे वीज आणि पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्ये म्हणजे अत्यल्प ऊर्जा, कमी खर्च आणि पर्यावरणपूरक रचना. वर्गखोल्यामधील तापमान नियंत्रित ठेवताना ही सिस्टीम पारंपरिक कुलिंग यंत्रणांच्या तुलनेत कमी वीज वापरते.

सदर प्रकल्प बी. टेक. अंतिम वर्षांतील कृष्णा एमेकर, श्रीनिवास घोरबांड, करण काळबांडे, सुधीर जाधव आणि अनुष्का बागटे या विद्यार्थ्यांनी डॉ. मोहम्मद जमिरूद्दीन यांच्या मार्गदर्शनात तयार केला आहे.

महाविद्यालयाच्या डायरेक्टर डॉ. गीता लाठकर, उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगिरे यांनी या नाविन्यपूर्ण प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. हा उपक्रम तरूण अभियंत्यांची हरित आणि शाश्वत भारताच्या दिशेने असलेली बांधीलकी अधोरेखित करते.

या प्रकल्पाचा वापर घर, पोल्ट्री फार्म, शाळा, महाविद्यालये, दवाखाने, चित्रपट गृहे इत्यादी ठिकाणी होऊ शकतो. भविष्यात विद्यार्थी या प्रकल्पासाठी पेटंट रजिस्टर करणार आहेत असे एका विद्यार्थ्यांने याप्रसंगी सांगितले. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल स्थापत्य विभागप्रमुख डॉ. अर्शद हाश्मी तसेच शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत ७९ ऑनलाईन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची नोंदणी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शहरी व ग्रामीण भागात एकूण ७९ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. मंडळांनी परराज्य, परजिल्हा तसेच स्थानिक बाजारातून अत्यंत आकर्षक व सुबक श्रींच्या मूर्तींची स्थापना केली आहे. सध्या मंडपांतील सजावटीची कामे अंतिम टप्प्यात आली असून, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



श्रींचे आगमन १४ सप्टेंबर रोजी होत असल्याने शहरी व ग्रामीण भागातील मोठ्या सार्वजनिक गणेश मंडळांकडून भव्य-दिव्य मंडप, विद्युत रोषणाई, परिसर स्वच्छता आणि लाईट्सची कामे पूर्ण केली जात आहेत. महानगरपालिकेच्या वतीने मंडळ परिसरात स्वच्छता राखण्यासाठी आणि पथदिवे/विद्युत सोयी उपलब्ध करून देण्यासाठी लोकप्रतिनिधींनी विशेष पुढाकार घेतला आहे.

सध्या ७९ गणेश मंडळांनी ऑनलाईन नोंदणी केली असली, तरी इतरही अनेक मंडळे नोंदणी प्रक्रियेसाठी प्रयत्नशील आहेत. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केलेल्या 'एक गाव, एक गणपती' या आवाहनाला यंदा नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.

श्री गणेश चतुर्थी व आगमन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाने कडक सुरक्षा व्यवस्था उभारली आहे. मुख्य मार्ग तसेच गावनिहाय सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार आणि होमगार्ड्सचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, सिडको-हडको परिसरातील 'नवसाला पावणारा ओंकार', 'महाराणा प्रताप', 'वैभव', आणि 'हडकोचा राजा शंभू गर्जना' यांसह परिसरातील अनेक नामांकित सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी व भाविक श्रींच्या मूर्तीचे आगमन आणि स्थापना करण्यात मग्न झाले आहेत.

# लोह्यात बँक ऑफ इंडियाचा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा




**लोहा (प्रतिनिधी)–** बँक ऑफ इंडियाला तब्बल १२१ तर लोहा शाखेला १५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल बँकेचा वर्धापन दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले.

लोहा येथील बँक ऑफ इंडिया शाखेत आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक मनोहर पाटील भोसीकर तर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरचे झोनल मॅनेजर मानस झा, डॉ. गजानन राठोड, दीपक शिंदे, प्रीतम लांडगे आदींची उपस्थिती होती.

प्रारंभी लोहा शाखेचे प्रबंधक अण्णाराव राठोड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून लक्ष्मी देवीचे पूजन करण्यात आले. तसेच केक कापून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. नांदेड येथील नंदीग्राम रक्तपेढी मार्फत आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी ५१ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना झोनल मॅनेजर मानस झा म्हणाले, बँक ऑफ इंडिया ही देशात नव्हे तर परदेशात देखील कार्यरत आहे. ७ सप्टेंबर १९०६ रोजी स्थापन झालेल्या बँकेने ग्राहकांच्या विश्वासावर १२१ वर्षे पूर्ण केली. बँकेचा केवळ व्यवसाय हे लक्ष नसून सामाजिक दायित्व देखील जपले जाते. मागील पंधरा वर्षाच्या कालावधी दरम्यान चालू वर्षात लोहा बँक शाखेचे व्यवस्थापक अण्णाराव राठोड यांच्या नियंत्रणाखाली शाखेचे उत्कृष्ट काम असल्याचा विशेष उल्लेख मानस झा यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपक शिंगारे, भास्कर उदगीरे, अशोक चव्हाण, अरविंद बतीन, गंगाधर बारसे, निलेश पारसेवार आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास बहुसंख्येने ग्राहकांची उपस्थिती होती. बँक व्यवस्थापक राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# एआयच्या पडद्यावर ८० च्या दशकाची 'झलक'; पण त्या काळातील उपेक्षित बालपण आजही अनाथच!

**भोकर (प्रतिनिधी)–** आज सर्वत्र एआयचा बोलबाला आहे. राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकही एआयच्या माध्यमातून आपले फोटो, १९८० च्या दशकातील चित्रपट, गावाकडचे वातावरण, जुन्या काळातील पोशाख आणि त्या वेळच्या जीवनशैलीत रूपांतरित करून सोशल मीडियावर अभिमानाने पोस्ट करताना दिसत आहेत. जुन्या काळाची आठवण करून देणाऱ्या या छायाचित्रांना मोठ्या प्रमाणात प्रतिसादही मिळत आहे.



१९८० च्या दशकातील हा 'लूक' आज अनेकांना आकर्षक वाटत असला, तरी त्या काळात प्रत्यक्ष असे जीवन जगणाऱ्या हजारो-लाखो गरीब मुलांचे बालपण मात्र आकर्षणाचा विषय नव्हते. फाटलेले, अंगावरील मळकट कपडे, पायात चप्पल नाही, हातात खेळणी नाहीत, शाळेची बॅग नाही, त्याऐवजी कधी पाण्याचा डबा, कधी कामाचे ओझे आणि पोटाची भूक घेऊन रस्त्यावर फिरणारी मुले समाजाच्या नजरेसमोर असूनही समाजाच्या संवेदनशीलतेपासून मात्र दूर होती.

आज एआयच्या माध्यमातून आपण 'गरीब दिसण्याचा' किंवा 'जुन्या काळातील ग्रामीण लूक' मिळवण्याचा अनुभव काही क्षणांसाठी घेतो; पण त्या काळातील गरिबीचा खरा अनुभव काय होता, हे त्या मुलांना विचारण्याची वेळ आपण कधी घेतली का?

आज एखाद्या व्यक्तीचा एआय फोटो जुन्या काळातील बनला की त्यावर शेकडो प्रतिक्रिया येतात. कुणी 'काय दिवस होते!' म्हणते, कुणी 'बालपण आठवले' म्हणते, तर कुणी जुन्या काळातील साधेपणाचे कौतुक करते. परंतु त्याच काळात भुकेल्या पोटी शाळेऐवजी कामावर जाणाऱ्या मुलांचे बालपण कोणाला आठवते?

ज्यांच्या घरात दोन वेळच्या जेवणाची भ्रांत होती, ज्यांना शिक्षणापेक्षा उदरनिर्वाह महत्त्वाचा होता, ज्यांच्याकडे चांगले कपडे, पादत्राणे किंवा खेळणी नव्हती, त्या मुलांसाठी १९८० चे दशक 'नॉस्टॅल्जिया' नव्हते. तो त्यांच्या जगण्याचा संघर्ष होता.

चार दशकांनंतर परिस्थिती बदलली. मोबाईल आला, इंटरनेट आले, डिजिटल क्रांती झाली आणि आता एआयचे युग आले. तंत्रज्ञानाने माणसाला काही सेकंदांत भूतकाळात नेण्याची ताकद दिली. मात्र प्रश्न असा आहे की, तंत्रज्ञानाने आपली संवेदनशीलताही वाढवली का?

आजही समाजाच्या कडेला राहणारी अनेक मुले शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षित निवारा आणि सन्मानाच्या जीवनापासून वंचित आहेत. बालमजुरी, गरिबी, कुपोषण, स्थलांतरित कुटुंबांची मुले आणि रस्त्यावरचे बालपण ही केवळ आकडेवारी नाही; ती आपल्या आजूबाजूला दिसणारी जिवंत वास्तवता आहे.

# शिवार

## शेतीचा नवा पॅटर्न...

# संकट हवामानाचे, उत्तर पॉलिहाउसचे!

**कधी अवकाळीचा मारा, कधी सोसाट्याचा वारा, तर कधी गारपिटीचा तडाखा! पारंपरिक शेती पूर्णपणे निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून राहिली असून, बळीराजा दरवर्षी उद्ध्वस्त होत आहे. निसर्गाच्या या लहरीपणाला आणि हवामान बदलाच्या संकटाला मात देण्यासाठी आता 'पॉलिहाउस तंत्रज्ञान' हाच एकमेव खात्रीशीर आणि क्रांतीकारी मार्ग ठरत आहे. बंदिस्त आणि नियंत्रित वातावरणात पिकांची लागवड करून शेतीला उद्योगाचे रूप देण्याचे सामर्थ्य या तंत्रज्ञानात आहे. थोडक्यात सांगायचे तर, 'शेती आता हवामानाच्या जिवावर नाही, तर शेतकऱ्याच्या नियोजनावर चालणार!'**



### पॉलिहाउस म्हणजे नक्की काय?

पॉलिहाउस म्हणजे पारदर्शक प्लॅस्टिक (पॉलिथिन) शीटच्या साहाय्याने तयार केलेली एक सुरक्षित संरचना. या संरचनेत सूर्यप्रकाश सहज आत येतो, पण आतील उष्णता बाहेर पडत नाही. यामुळे वनस्पतींच्या वाढीसाठी लागणारे तापमान, आर्द्रता, प्रकाश, वारा आणि पाणी कृत्रिमरीत्या नियंत्रित केले जाते.

### प्रमुख दोन प्रकार

- नैसर्गिक वायुवीजन असणारे (Natural Ventilated) : हवेच्या खेळासाठी व्हेंट्स असतात. कमी खर्चात मध्यम हवामानाच्या भागासाठी उत्तम.
- स्वयंचलित / फॅन अँड पॅड सिस्टिम (Hi-Tech) : संगणकीय यंत्रणा, एक्झॉस्ट फॅन आणि कुलिंग पॅड्सद्वारे बाहेरील हवामान कितीही वाईट असले तरी आतील तापमान हवे तसे राखता येते.

### महाराष्ट्रात पॉलिहाउसचा डंका!

- संरक्षित शेतीत आपला महाराष्ट्र देशात अग्रगण्य आहे. विशेषतः पुणे, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांनी पॉलिहाउस शेतीत बाजी मारली आहे.
- शासकीय पाठबळ : राज्य शासनाच्या 'पोकरा', 'एमआयडीएच' आणि 'एलएचबी' यांसारख्या योजनांतून शेतकऱ्यांना ५० ते ७५ टक्क्यांपर्यंत मोठे अनुदान उपलब्ध आहे.
- बाजारपेठेची संधी : मॉल्स, पंचतारांकित हॉटेल्स, सुपरमार्केट्स आणि थेट परदेशी निर्यातीतून पॉलिहाउस उत्पादनांना प्रचंड मागणी आहे.

### 'या' आव्हानांकडे दुर्लक्ष करू नका

- पॉलिहाउस तंत्रज्ञान जसे फायद्याचे आहे, तसेच ते अत्यंत शिस्तबद्ध व्यवस्थापनाची मागणी करते.
- मोठी सुरुवातीची गुंतवणूक : उभारणीचा खर्च जास्त असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हे थोडे आव्हानात्मक आहे.

### 'या' आव्हानांकडे दुर्लक्ष करू नका

- पॉलिहाउस तंत्रज्ञान जसे फायद्याचे आहे, तसेच ते अत्यंत शिस्तबद्ध व्यवस्थापनाची मागणी करते.
- मोठी सुरुवातीची गुंतवणूक : उभारणीचा खर्च जास्त असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हे थोडे आव्हानात्मक आहे.
- तांत्रिक कौशल्याची गरज : तापमान, आर्द्रता आणि खतांचे गणित चुकले किंवा निष्काळजीपणा झाला, तर कीड-रोगांचा प्रसार वेगाने होऊ शकतो.
- वीज अन् पाण्याचे नियोजन : फॅन, पॅड आणि सिंचनासाठी अखंडित वीज आणि पायी पुरवठा आवश्यक असतो.
- बाजारपेठेतील चढ-उतार : उत्पादनापूर्वीच योग्य बाजारपेठ (मार्केट लिंक) शोधणे अत्यंत गरजेचे आहे.

### पॉलिहाउस ठरतेय वरदान

- ५ ते १० पट अधिक उत्पादन : उघड्या शेतीच्या तुलनेत कमी जागेत ५ ते १० पटीने अधिक आणि दर्जेदार उत्पादन मिळते.
- हंगामाबाहेरही पीक (Off-Season Crop) : ऋतू कोणताही असो; बाजारात ज्या पिकाला जास्त भाव आहे, ते पीक घेण्याची पूर्ण मुभा.
- निसर्गाच्या कोपापासून पूर्ण संरक्षण : गारपीट, अवकाळी पाऊस, तीव्र उष्णता आणि चक्रीवादळापासून पिकांचे शंभर टक्के संरक्षण.
- पाणी अन् खतांची मोठी बचत : ठिबक सिंचन आणि फर्टिगेशनमुळे तब्बल ६० ते ८० टक्के पाण्याची बचत होते.
- कीड-रोगांना चाप : बंदिस्त वातावरणामुळे किडींचा प्रादुर्भाव कमी होऊन कीटकनाशकांचा अवाजवी खर्च वाचतो.
- नफा देणारी उच्च मूल्य पिके : जरबेरा, कार्नेशन, गुलाब यांसारखी फुले आणि रंगीत ढोबळी मिरची, चेरी टोमॅटो, काकडी यांसारख्या निर्यातक्षम पिकांचे उत्पादन सहज शक्य.
- पॉलिहाउस हे केवळ अनुदान मिळवून शेड उभे करण्याचे साधन नाही, तर तो एक परिपूर्ण उद्योग आहे. योग्य तांत्रिक प्रशिक्षण, बाजारपेठेचा अभ्यास आणि सातत्यपूर्ण देखरेख ठेवल्यास पॉलिहाउस शेती हीच बळीराजाला समृद्धीच्या शिखरावर नेणारी खरी दिशा ठरेल!



# पावसाळ्यात पॉलिहाउस करा 'सुरक्षित'

**पावसाळा सुरू झाला की शेतात आनंद ओसंडून वाहतो, पण पॉलिहाउसधारकांसाठी हाच काळ खरा 'परीक्षेचा' ठरतो! सततचा पाऊस, सूर्यप्रकाशाचा पत्ता नसलेले ढगाळ वातावरण, हवेत तुडुंब भरलेली आर्द्रता आणि तापमानाचा रोज बदलणारा मूड... या सगळ्यामुळे पॉलिहाउसच्या आत रोगांचे आणि किडींचे 'राज्य' येण्याचा धोका असतो. पण घाबरण्याचे कारण नाही! थोडे नियोजन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि कडक शिस्त पाळली, तर टोमॅटो, ढोबळी मिरची, काकडी असो वा जरबेरा-गुलाब; तुमचे उत्पादन आणि बाजारमूल्य दोन्ही 'नंबर वन'च राहणार!**



### प्रकाश अन् परागीकरण : झाडांची छाटणी करा!

- ढगाळ वातावरणामुळे प्रकाश कमी मिळतो. त्यामुळे झाडांमध्ये अनावश्यक गर्दी टाळा.
- छाटणी : जुनी, पिवळी व रोगट पाने आणि अतिरिक्त फुटवे वेळेवर काढून टाका, जेणेकरून हवा व प्रकाश मोकळेपणाने खेळेल.
- परागीकरण : टोमॅटो, ढोबळी मिरचीमध्ये सकाळी हलक्या कंपनाने परागीकरणास मदत करा. मधमाशी पेट्यांचे योग्य व्यवस्थापन ठेवा.

### ड्रेनेज अन् शेडची कडक पाहणी : पाण्याचा थेंबही आत नको!

- पॉलिहाउसच्या बाहेर पाणी साचले, की ते जमिनीखालून बेडमध्ये झिरपते.
- चर आणि गटर : बाहेर खोल चर काढा. छतावरील गटरमध्ये पालापाचोळा साचू देऊ नका; अन्यथा पाणी ओव्हरफ्लो होऊन आत शिरेल.
- पॉली रिपेअर टेप : पॉलीफिल्म फाटली असल्यास त्वरित पॉली रिपेअर टेपने बंद करा.
- प्रवेशद्वारावर बायो-सिक्युरिटी : दारात पोटॅशियम परमँगनेटचे द्रावण ठेवा; पायांद्वारे येणाऱ्या जिवाणूंना तिथेच रोखा!
- नियमित ऑडिट : जीआय स्ट्रक्चर, बोल्ट, नेट यांची तपासणी करा. दररोज तापमान, आर्द्रता, EC आणि pH ची नोंद वहीत ठेवा.
- थोडक्यात काय तर... पावसाळ्यातील पॉलिहाउस व्यवस्थापन हे केवळ पिकांचे संरक्षण नसून, उच्च उत्पादकता आणि शाश्वत शेतीचा 'मास्टरप्लॅन' आहे!



### आर्द्रतेचा 'ताप' : हवा खेळती ठेवा, फॉगर्सला पूर्ण 'ब्रेक'!

- पावसाळ्यात हवेतील ओलावा ८० ते ९० टक्क्यांवर पोहोचतो. अशा वेळी ग्रीन हाउसमध्ये डाऊनी, पावडरी मिल्ड्यू आणि करप्याचा हल्ला होतो.
- सापेक्ष आर्द्रताः ६० ते ८० टक्क्यांच्या दरम्यानच राहिली पाहिजे.
- हवा खेळती ठेवाः पाऊस नसेल तेव्हा बाजूचे पडदे आणि टॉप व्हेंट उघडून हवा आत-बाहेर खेळती ठेवा. गरजेनुसार एअर ह्युमॅटिक पंखे सुरू करा.
- फॉगर्स बंदः हवेत आधीच ओलावा असल्याने फॉगिंग किंवा मिस्टिंग सिस्टीम पूर्णपणे बंद ठेवा.

### खत व्यवस्थापन : नत्राला 'ब्रेक', पोटॅश अन् कॅल्शिअमला 'बूस्ट'!

- सूर्यप्रकाश नसल्याने पिकांची अन्न तयार करण्याची गती मंदावते.
- नत्राचा अतिवापर टाळाः जास्त नत्र दिल्यास झाडे लुसलुशीत होऊन रोगांना बळी पडतात.
- हेच द्या : पिकांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पोटॅश, कॅल्शिअम, बोरॉन आणि विद्राव्य खतांवर भर द्या. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता दिसताच फवारणी घ्या.

### रोग अन् किडींवर 'सर्जिकल स्ट्राईक'

- बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांची वाट न पाहता 'ॲक्शन मोड'वर या!
- प्रतिबंधात्मक फवारणी : दर ७ ते १० दिवसांनी आलटून-पालटून शिफारशीनुसार बुरशीनाशके फवारा.
- स्वच्छतेचा नियम : रोगट, सडलेली पाने, फुले व फळे तात्काळ तोडून पॉलिहाउसबाहेर नष्ट करा.
- किडींचा बंदोबस्त : पांढरी माशी, मावा, लाल कोळी यांसाठी पिवळे-निळे चिकट सापळे व जैविक नियंत्रणाचा वापर करा.

# पॉलिहाउससाठी पॉलिफिल्मची निवड

**शेतीमध्ये तंत्रज्ञानाची क्रांती घडवून आणणारे पॉलिहाउस हे केवळ प्लास्टिकचे छत नसून शेतकऱ्यांच्या समृद्धीचे कवच आहे! पॉलिफिल्ममुळे सूर्यप्रकाशाचा आवश्यक भाग पिकांपर्यंत पोहोचतो; तसेच पाऊस, वारा आणि बदलत्या हवामानापासून पिकांचे ढाल बनून संरक्षण होते. पण, बाजारात मिळणारी कोणतीही प्लास्टिक फिल्म आणून मारली म्हणजे काम झाले, असा भ्रम बाळगू नका! फिल्मचा रंग किंवा जाडी एवढाच निकष न ठेवता तिचे तांत्रिक गुणधर्म, यांत्रिक मजबुती आणि टिकण्याची क्षमता तपासणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य पिकासाठी, योग्य हवामानात, योग्य गुणधर्मांची पॉलिफिल्म निवडली नाही तर अतोनात नुकसान अटळ आहे. चला तर मग, जाणून घेऊया पॉलिफिल्म निवडीचा आणि संरक्षणाचा 'मास्टरप्लॅन'!**

### पॉलिफिल्म बसवताना अचूकता बाळगा!

- फिल्म कितीही महागडी असली, तरी ती बसवताना निष्काळजीपणा केला तर पैशांचा चुराडा ठरलेला आहे.
- योग्य वेळ व हवामान : उन्हाची तीव्रता कमी असताना सकाळी ९ च्या आधी किंवा संध्याकाळी ५ नंतरच फिल्म बसवा. कडक उन्हात ताणलेली फिल्म नंतर आकुंचन पावू शकते, तर थंडीत बसवलेली उन्हाळ्यात सैल पडते.
- सांगाड्याची पूर्वतपासणी : लोखंडी सांगाड्याच्या गंजलेल्या किंवा टोकदार भागांवर 'पॉलीप्रोपिलीन टेप' किंवा व्हाईट पेंट लावा. जीआय पाइप्सचे सांधे एकदम गुळगुळीत ठेवा.
- ग्रिप अन् ताण : फिल्म फिक्स करण्यासाठी ॲल्युमिनियम प्रोफाइल आणि झिगझॅग स्प्रिंगचाच वापर करा. कुठेही खड्डे किंवा सैलपणा राहू देऊ नका; अन्यथा पावसाचे पाणी साचून वजनाने छत फाटू शकते.
- योग्य बाजू ओळखा : ५-लेअर फिल्मवर This side inside / towards crop असे छापलेले असते. ही प्रिंट वाचूनच अँटी-ड्रिप लेअर पिकांच्या बाजूने अंथरा.



### देखभालीचा कडक नियम आणि पूर्वतयारी

- धूळ साफ करा : धूळ साचल्यास प्रकाश २० ते ३० टक्क्यांनी कमी होतो. महिन्यातून एकदा मऊ कापडाने किंवा कमी दाबाच्या पाण्याने फिल्म स्वच्छ करा.
- रसायनांचा थेट मारा टाळा : तांबेयुक्त (Copper-based) कीटकनाशकांचा संपर्क फिल्मशी येऊ देऊ नका. या रसायनांमुळे युव्ही लेअर नष्ट होऊन फिल्म कडक होऊन फाटते.
- तात्काळ रिपेअर : लहान कट किंवा भेग दिसताच विशेष 'पॉलिहाउस रिपेअर टेप' लावा. साधा सेलोटेप वापरण्याची चूक करू नका!
- वादळापूर्वी ॲक्शन : वादळ किंवा जोराचा वारा येण्यापूर्वी सर्व साइड व्हेंट आणि दरवाजे घट्ट बंद करा, जेणेकरून हवेच्या दाबाने छत उडणार नाही.



### पॉलिफिल्मचे 'पाच' तांत्रिक शस्त्रे

- पॉलिहाउसच्या आत पिकांचे 'राज्य' उत्तम चालण्यासाठी फिल्ममध्ये काही गुणधर्म असणे अनिवार्य आहे...
- यूव्ही स्टॅबिलायझेशन : अतिनील (UV) किरणांपासून प्लास्टिकचे रक्षण करते, ज्यामुळे फिल्म कडक न होता ३ ते ५ वर्षे भक्कम टिकते.
- प्रकाश विकिरण (Diffused Light) : सूर्यप्रकाश सर्व भागांत समान पसरवतो. त्यामुळे खालील पानांपर्यंत प्रकाशसंश्लेषण (Photosynthesis) व्यवस्थित होते.
- अँटीड्रिप जादू : आतील बाजूस वाफेचे थेंब साचून पिकांवर पाझरत नाहीत; परिणामी बुरशीजन्य रोगांचा धोका पूर्णपणे टळतो.
- थर्मल प्रभाव : रात्रीच्या वेळी जमिनीतील उष्णता बाहेर पडू न देता आतील तापमान नियंत्रित ठेवते.
- धूळ रोधक (Anti-Dust) : बाहेरच्या बाजूला धूळ साचू देत नाही, ज्यामुळे प्रकाशाची पारदर्शकता नेहमी कायम राहते.

### मायक्रॉन अन् जीएसएमचा योग्य 'हिशोब'

- पॉलिफिल्म निवडताना नावावर न जाता तिची जाडी (मायक्रॉन) आणि वजन (जीएसएम) तपासूनच खरेदी करा!
- २०० मायक्रॉन (सर्वोत्तम पर्याय) : भारतातील ८० ते ९० टक्के पॉलिहाउससाठी हाच 'नंबर वन' मानकीकृत पर्याय आहे. ही फिल्म ३ ते ५ वर्षे सहजरित्या टिकते.
- १५० मायक्रॉन : केवळ तात्पुरत्या शेडनेट किंवा कमी बजेटसाठी. कडक ऊन किंवा वादळात १-२ वर्षांतच याचा 'गेम' होतो.
- २५०+ मायक्रॉन : अतिशय वादळी, कडक वारे किंवा बर्फवृष्टीच्या भागासाठी. मजबूत असली तरी प्रकाशाची पारदर्शकता थोडी कमी होते.
- जीएसएमची काळजी : २०० मायक्रॉन फिल्मचे वजन १९० ते २०५ जीएसएम असावे. खरेदी करताना सर्वत्र एकसमान जाडी आणि जीएसएम आहे का, हे नक्की तपासा.

# दिशा सालियन प्रकरणाला नवं वळण; आदित्य ठाकरेंसह उद्धव ठाकरे, अनिल देशमुख यांच्या नावाचा उल्लेख



**मुंबई(प्रतिनिधी)**–सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला आता पुन्हा एक नवं वळण लागलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात नव्याने आदेश दिल्यानंतर सीबीआयने एफआयआर दाखल केला आहे. त्यामध्ये आदित्य ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्यासह अनेकांनी नावे असल्याचं उघड झालं आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या जबाबानुसार नवा एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

८ जून २०२० रोजी मुंबईतील मालाड इथे एका इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून पडून दिशा सालियनचा मृत्यू झाला होता. दिशाच्या मृत्यूनंतर अवघ्या सहा दिवसांनी, म्हणजेच १४ जून २०२० रोजी अभिनेता सुशांत सिंह राजपूतने त्याचं जीवन संपवलं होतं. आता सीबीआयनं एफआयआर दाखल केल्याने याप्रकरणाला नवं वळण मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणी सीबीआयनं मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार नव्याने गुन्हा दाखल केला आहे. एफआयआरमध्ये दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांच्या जबाबाचा उल्लेख आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रकरण दडपण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असा आरोप सतीश सालियन यांनी केला आहे. या जबाबात उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह, एन्काऊंटर स्पेशलिस्ट सचिन वाझे, अभिनेता सूरज पांचोली, दिनो मोरिया, रिया चक्रवर्ती यांच्या नावांचाही उल्लेख आहे.

फाइल्स आणि सरकारी नोंदी नष्ट करणे किंवा दडपणे, त्यात फेरफार करणे, आरोपींना वाचवण्यासाठी सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग करणे, यासारख्या प्रकरणांची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी सतीश सालियन यांनी जबाबात केली आहे.

या बड्या नावांसोबत दिशा सालियानच्या वडिलांनी मुंबई पोलिसातील काही अधिकाऱ्यांच्यावरही आरोप केले आहेत. त्यामध्ये पोलीस उपाआयुक्त विशाल ठाकूर, पोलीस निरीक्षक जगदेव कलापाड, पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, पोलीस निरीक्षक चिमाजी जाधव, पोलीस निरीक्षक अर्जुन राजने आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक देवढे यांच्यावरही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

दरम्यान, या प्रकरणावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची फाईल आधी याच सरकारने बंद केली होती. आता या प्रकरणात सुडाचं राजकारण नाकारता येत नाही, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ७७२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सुमया बेगम शेख असलम रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७७२ वार्ड नं. १५ अब्दुल गुफणार अब्दुल हमीद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ११०१/२६ दि. १०/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-प्लॉट क्र. ४३, पश्चिमेस-प्लॉट क्र. ४७, दक्षिणेस-२० फुटाचा रोड, उत्तरेस -प्लॉट क्र. ४५.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८३१

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ४९१ व ४९२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मोगम मैफुल बेग महेबूब बेग रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं.४९१ व ४९२ वार्ड नं. २१ श्रीनिवास यादवराव नेमाणीवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०९५/२६ दि. ९/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-३० फुटाचा रोड, पश्चिमेस-२० फुटाचा रोड, दक्षिणेस-३० फुटाचा रोड, उत्तरेस -प्लॉट क्र. ३४ व ३७.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. ४५१/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सुनेराबी शेख अक्रम, शेख शाहीद शेख अक्रम रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं.४५१/२ वार्ड नं. १९ अ. शेख अक्रम शेख पाशा यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ३२३८/२६ दि. ९/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-अन्सार शेवाळकर यांचे शेत, पश्चिमेस-अजिस यांचे घर, दक्षिणेस-२० फुटाचा रोड, उत्तरेस -शेख अक्रम यांचा प्लॉट.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ, मालमत्ता क्र. ६७४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रुबीना परवीण सय्यद नजीर रा. उमर चौक, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं.६७४ वार्ड नं. १८ अ. मिर्झा अक्रम अली बेग यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ५३४/२६ दि. ३/०४/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल. पूर्वेस-२० फुटाचा रस्ता, पश्चिमेस-प्लॉट क्र. ६०७, दक्षिणेस-प्लॉट क्र. ६७३, उत्तरेस -प्लॉट क्र. ६७५.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

# मोहसीन नक्वीला स्टेजवर पाहताच स्मृती मानधना माघारी फिरली

**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**– भारताच्या महिला क्रिकेट संघाने रविवारी दुबईत रंगलेल्या आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्रीलंकेचा ७२ धावांनी पराभव करत विजेतेपद जिंकले. या सामन्यानंतर दुबईतील मैदानात हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. या सामन्यानंतर आशियाई क्रिकेट समितीचे प्रमुख आणि पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांच्याकडून विजेत्या संघाला चषक दिला जाणार होता. मात्र, टीम इंडियाने मोहसीन नक्वी यांच्या हातून ट्रॉफी घ्यायला नकार दिला. त्यामुळे मोहसीन नक्वी हे पुढचा अपमान टाळण्यासाठी दुबईतील मैदानातून निघून गेले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर सध्या तुफान व्हायरल होत आहे. या व्हीडीओत मोहसीन नक्वी हे मैदानातून बाहेर पडताना दिसत आहेत.

यावेळी मैदानातील भारतीय प्रेक्षक मोठ्या आवाजात त्यांची हुर्रे उडवताना दिसत आहेत. या सगळ्या नाट्यमय घडामोडींची सध्या क्रिकेटविश्वात चर्चा सुरु आहे.

## Change In Name

MY OLD NAME IS SK Aleem NOW I AM CHANGING AS NEW NAME Shaikh Aleem HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME.

**Adress**-peerburhan nagar Nanded
Phone number: 9423438645

# स्वत:ची भाषा बोलण्याबद्दल न्यूनतेची भावना नसावी -अमित शाह

**मुंबई(प्रतिनिधी)**–हिंदी दिनानिमित्त आपल्या आभासी संबोधनात गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, इतर भारतीय भाषांमध्ये हिंदीची बरोबरी होऊ शकत नाही. ते म्हणाले की, भारताची भाषिक विविधता हीच तिची सर्वात मोठी ताकद आहे आणि प्रत्येक भाषेसोबत इतिहास, लोकपरंपरा आणि संस्कृती जोडलेली असते. शाह यांनी तरुणांना शक्य तितक्या भाषा शिकण्याचे, पण आपली मातृभाषा सोडू नये, तसेच स्वत:ची भाषा बोलण्याबद्दल न्यूनतेची भावना नसावी, असे आवाहनही शहा यांनी केले.

## Change in Name

I HAVE CHANGED MY NAME FROM (Old Name)
**SHAIKH MOIJ AHAMAD**
To (New Name)
**SHAIKH MOIJ AHAMAD SHAIKH MANJUR AHAMAD**
FOR PASSPORT ISSUANCE

Address: 09 Nara galli Kundalwadi,Nanded-431711

**Affidavit No. 22AA 297823**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १४ मालमत्ता क्र. ३७७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, फरहाना बेगम शेख अबरार रा. मालेगाव, ता. इस्लामाबाद यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं.३७७ वार्ड नं. १४. बिस्मीलाबी उमर खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०५०/२६ दि. २७/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस- प्लॉट क्र. १ ची जागा, पश्चिमेस-प्लॉट क्र. ३, दक्षिणेस-रस्ता, उत्तरेस -शबीर कॉलनीची जागा.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १९ मालमत्ता क्र. २५३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख जबीर शेख नबीसाब रा. ..., ता. ....यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २५३ वार्ड नं. १९. शेख अरबाज शेख पाशा यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २४९०/२६ दि. ०२/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस- बेबीताई यांची जागा, पश्चिमेस-शेख गुलाब यांची जागा, दक्षिणेस-मुझीब खान उमर खान, उत्तरेस -रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १२ मालमत्ता क्र. २२५/२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शरीना बेगम शेख अरबाज रा. हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२५/२ वार्ड नं. १२. निलावती दादाराव वाडेकर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २५४३/२६ दि. ०७/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस- माथेवाड सर, पश्चिमेस-स्मशानभूमी, दक्षिणेस-रोड, उत्तरेस -मुक्तार चातारकर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२४

नाव परिवर्तन वार्ड क्र. २० मालमत्ता क्र. १६२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, ज्योती प्रकाश नारखेडे रा. खडकी बाजार, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १६२ वार्ड नं. २०. गुरुकुल शिक्षक व शिक्षकेत्तर गृहनिर्माण संस्था शारदा नगर तर्फे कमलाकर धोंडोपंत कमठे यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०७६/२६ दि. ०३/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस- सकवान यांचे शेत, पश्चिमेस-अंतर्गत रस्ता, दक्षिणेस-प्लॉट क्र. ३०, उत्तरेस -प्लॉट नं. २८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर प्रगटन
**देगलूर नगर परिषद, देगलूर**
जा.क्र.४००८

**नाव परिवर्तन/नवीन नोंद करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, संतोषी दत्तात्रय थडके रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून सर्व्हे नं. ...गट नं. ९१८ मधील प्लॉट नं. १५, मालमत्ता क्र. १६९४९ वर कैलास बळीराम पाटील यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखताआधारे/कोर्ट डिग्री आधारे/सातबारा आधारे त्यांचे नाव नवीन नोंद / फेर नोंद करून घेऊ इच्छितात.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : प्लॉट नं. १४, **पश्चिमेस** : १२ मीटरचा रोड, **दक्षिणेस** : प्लॉट नं. १२, **उत्तरेस** : प्लॉट नं. १६.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगर परिषद, देगलूर**

### जाहीर प्रगटन
**देगलूर नगर परिषद, देगलूर**
जा.क्र.४००६

**नाव परिवर्तन/नवीन नोंद करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अनिल मारोतीराव वरखिंडे व पद्मावती आनंद जाधव रा. देगलूर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून सर्व्हे नं. ...गट नं. ९१८ मधील प्लॉट नं. १७, मालमत्ता क्र. १६९३२ वर गंगाधर बळीराम पाटील यांच्या नावाने असलेली जायदाद खरेदीखताआधारे /कोर्ट डिग्री आधारे/सातबारा आधारे त्यांचे नाव नवीन नोंद / फेर नोंद करून घेऊ इच्छितात.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : प्लॉट नं. १६ व १९, **पश्चिमेस** : ९ मीटरचा रोड, **दक्षिणेस** : प्लॉट नं. १६, **उत्तरेस** : गट नं. ९४५.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. नसता मुदतीनंतर अर्जदाराच्या नावाची नोंद घेण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**देगलूर नगर परिषद, देगलूर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ मालमत्ता क्र. ५६५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रुक्मीनबाई विठ्ठल सुदलवार रा. मंगरूळ ता. ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५६५ वार्ड नं. १८. अब्दुल मतीन अब्दुल मलीक यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ६४/२३ दि. १६/०२/२०२३ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस -प्लॉट नं. ४७, पश्चिमेस- कॉलनी रस्ता, दक्षिणेस-प्लॉट क्र. ४१, उत्तरेस -प्लॉट नं. ३९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

### जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र. ८२२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १ मालमत्ता क्र. ४०६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, राजू पेंटन्ना शेनेवाड रा. प्रतापगल्ली हिमायतनगर, ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४०६ वार्ड नं. १. गणपत नरसिंगा गुंडेवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०६३/२६ दि. ०१/०९/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस - पंढरी गुंडेवार यांची प्लॉटींग, पश्चिमेस-६ मीटरचा रस्ता, दक्षिणेस-प्लॉट क्र. १२, उत्तरेस - प्लॉट नं. १४.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**


## टी. सी. हरवली

माझी शीतल सदाशिव पांचाळ या नावाची इयत्ता नववी पासची टी. सी. नांदेड ते धनेगाव दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**–शीतल सदाशिव पांचाळ मो. क्र. ७४९९५८२११८

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



॥ जय सहकार ॥

# ४ विविध कार्यकारी सहाकरी ग्रामोद्योग संघ मर्या. नांदेड

**रजि. नं.: एनएनडी/ आरएसआर/१०९/७२ दि. २९ जुलै १९७२**
**कार्यालय द्वारा सौ. प्रमोदिनी संजय सारंगधर यांच्या जागेत, विरभद्र नगर, कोठा, नांदेड**

जा.क्र.: दिनांक : १५/०९/२०२६

## :: वार्षीक सर्व साधारण सभा नोटीस ::
## (फक्त सभासदांकरीता)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या, संस्थेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३०/०९/२०२६ रोजी रविवार सकाळी ठिक ११:०० वाजता, संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे विद्यमान मा. अध्यक्ष श्री नारायण चांदुजी कसबे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सभेस उपस्थित राहुन सहकार्य करावे, ही विनंती.

सभेपुढील विषय :- १. दि. २९/०९/२०२५ रोजी घेतलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल वाचन करुन कायम करणे. २. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे आर्थिक पत्रके, जमाखर्च, नफा-तोटा व ताळेबंदाचे वाचन करुन मान्यता देणे. ३. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकातील तरतुदीपेक्षा कमी अधिक झालेल्या जमा खर्चास मान्यता देणे. ४. सन २०२५-२६ या वर्षाचे लेखा परिक्षण अहवाला बाबत. ५. सन २०२६-२७ चे लेखापरिक्षण करणेसाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे बाबत. ६. सन २०२६-२७ च्या नियोजित अंदाज पत्रकास मंजुरी देणे बावत. ७. सन २०२६-२७ च्या डेड स्टॉकवर झिज आकारणी करणे बाबत. ८. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| **नारायण चांदुजी कसबे** | **नरसिंगा रामराव मलदोडे** | **सुरेश भीमराव वाघमारे** |

**स्थळ : नांदेड**
**दिनांक : १५/०९/२०२६**

**टीप :- या संस्थेच्या आदर्श उपविधीनुसार कोरण आभावी सभा तहकुब झाल्यास, तिच सभा, त्याच दिवशी, त्याच ठिकाणी १ तासानंतर घेण्यात येईल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.**

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India
Ph.No. 02462-234813, 241266, 243559
E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

No. 1308/26-27 Date-14/9/2026

## GURUDWARA TAKHAT SACHKHAND SHRI HAZUR ABCHALNAGAR SAHIB, NANDED

# TENDER NOTICE

Sealed tenders are invited from reputed and experienced **RO Plant Manufacturers/Authorized Dealers/Agencies for:**

"Supply, Installation, Testing & Commissioning of 2000 LPH RO Plant for Langer Hall Boiler at Gurudwara Takhat Sachkhand Shri Hazur Sahib, Nanded, on Turnkey Basis."

**BriefSpecifications:-**

2000 LPH RO Plant suitable for boiler feed-water application comprising RO Product Water Tank 5,000 L, Raw Water Feed Pump, Multi Grade Filter, Activated Carbon Filter, Water Softener, Micron Filter, High Pressure Pump, RO Membranes & Housing, Chemical Dosing System, Online TDS/Conductivity Meter, Flow Meters, Pressure Gauges, Automatic/Control Panel, complete piping, valves, electrical works, earthing, installation, testing and commissioning.

The quoted rate shall include **all equipment, transportation, installation, labour, tools & tackles, electrical/mechanical works, allied works, testing, commissioning and GST,** complete in all respects. **Minimum Warranty:** 1 Year from successful commissioning. Interested bidders shall inspect the site and submit their offer with detailed technical specifications, make/model and commercial quotation.**Last Date for Submission**: 23/09/26 **Date & Time of Opening:** 24/09/26.

Tender detailed terms & conditions may be obtained from the **Water Section Gurudwara Takhat Sachkhand Shri Hazur Sahib Board, Nanded. Contact:** 02462-234813 | **Email:** contact@hazursahib.com

**Superintendent,**
**Gurudwara Sachkhand Board, Nanded**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308






**मुंबई/नांदेड –** खा. अशोकराव चव्हाण यांच्या मुंबई येथील निवासस्थानी श्रींची प्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी माजी आमदार अमिता चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण व सुजया चव्हाण यांनी श्रींचे पूजन केले. दुसऱ्या छायाचित्रात भाजपचे नांदेड महानगराध्यक्ष तथा आ. अमरनाथ राजूरकर यांच्या निवासस्थानी गणरायांची प्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी मृणाल राजूरकर, आशुतोष राजूरकर, मृण्मयी राजूरकर दिसत असून, तिसऱ्या छायाचित्रात आ. बालाजी कल्याणकर यांच्या निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले असून, त्यांनी सपत्नीक श्रींची आरती केली तर शेवटच्या छायाचित्रात आ. आनंद बोंढारकर यांच्या निवासस्थानी गणरायाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. यावेळी बोंढारकर कुटुंबीय दिसत आहे. (छाया : करणसिंह बैस)

# सिडको-हडको परिसरासह ग्रामीण भागात गणरायाचे उत्साहात आगमन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको, हडको परिसरासह ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील ३२ गावांत सार्वजनिक गणेश मंडळांच्या श्रींचे ढोलताशांच्या गजरात व पारंपरिक वाद्यवृंदामध्ये आगमन झाले. रात्री उशिरापर्यंत विधीवत पूजन करून श्रींची स्थापना करण्यात आली असून, शहरी व ग्रामीण ८२ गणेश मंडळांनी ऑनलाईन परवानगी घेतली आहे. नवीन नांदेड भागातील हडको येथील ओंकार गणेश मंडळाने हैदराबाद तर नवयुवक प्रस्तुत हडकोचा राजा शंभू गर्जना गणेश मंडळाने लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथून तर वीर सावरकर यांनी पृथ्वी उभी असलेली आकर्षक गणेश मूर्ती आणली आहे.





ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या शहरी व ग्रामीण भागातील ८२ ऑनलाईन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी नोंदणी केली असून, विनापरवानाही अनेक गणेश मंडळांनी गणेश मूर्तीची प्रतिष्ठापणा केली. विष्णुपुरी, धनेगाव, वाजेगाव, तुप्पा, काकांडी, गोपाळचावडी यासह अनेक गावांत तर नवीन नांदेड भागातील जुना कौठा, नवीन कौठा, वसरणी, वाघाळा, असदवन, असर्जन या भागासह क्रांती चौक, ज्ञानेश्वर नगर, वैभव नगर, राम नगर, सिडको, हडको भागातील विविध ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी परराज्यातील हैद्राबादसह विदर्भातील अकोला, उमरखेड, लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, लोहा, पालम तालुक्यातील व नांदेड शहरातील जुना कौठा, नवीन कौठा भागातील मूर्तीकार यांच्याकडून आकर्षक व भव्य-दिव्य गणेश मूर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आणल्या आहेत. ओंकार गणेश मंडळ, शिव गणेश, सूर्या गणेश, राजस्थानी गणेश, नटराज गणेश, काळा हनुमान गणेश, युवा शक्ती गणेश, छत्रपती शिवाजी गणेश मंडळ, महाराणा प्रताप गणेश मंडळ आदींनी ढोलताशाच्या गजरात व पारंपरिक वाद्यवृंदात मूर्तींची स्थापना केली. भव्य मंडप, विद्युत रोषणाई, आकर्षक सजावटीमुळे परिसर चैतन्यमय बनले आहे.

मनपा प्रभाग क्रमांक १९ च्या अनुराधा राजू पाटील काळे, सुलोचना धोंडीबाराव काकडे, दीपाली संतोष मोरे, अभिषेक सौदे, २० चे संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, मंगला देशमुख, सुवर्णा बसवदे, निरंजना लांडगे यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या ठिकाणी विद्युत लाईटसह स्ट्रीट लाईट व परिसरातील साफसफाई करून देण्यासाठी पुढाकार घेतला. सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता निरीक्षक किशन वाघमारे, अर्जुन बांगडी यांनी पुरूष व महिला कामगार यांच्यामार्फत स्वच्छता करून घेण्यात आली. मुख्य रस्ता व अंतर्गत भागातील विद्युत दिवे व स्ट्रीट लाईट चालू केले आहेत. ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, पोलीस अमलदार यांनी शहरी व ग्रामीण भागात चोख पोलीस बंदोबस्त लावला आहे.

## सिडको बाजारपेठेत श्री गणेश मूर्ती खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी

गणेश चतुर्थीनिमित्ताने सिडको परिसरातील मुख्य बाजारपेठमध्ये आकर्षक व सुबक मूर्ती खरेदी करण्यासाठी नागरिकांनी सहपरिवार गर्दी केली होती. यावेळी श्रींच्या पूजेसाठी लागणारे साहित्यासह अनेक दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती. यावेळी होणारी गर्दी पाहता ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस, होमगार्ड यांनी गर्दीवर नियंत्रण ठेवले. तर मनपाच्या वतीने दोन्ही बाजूंनी बॅरिकेटस लावण्यात आले होते. यामुळे अनेक मूर्ती, फळे व फुले विक्रेते यांना दिलासा मिळाला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिडको परिसरातील मुख्य बाजारपेठेत मूर्ती विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. या आकर्षक मूर्ती खरेदीसाठी मराठवाडा, विदर्भासह परराज्यातील अनेक ठिकाणांहून आलेल्या गणेशभक्तांनी सकाळपासूनच गर्दी केली होती.

नांदेड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांतून विधीवत पूजेसाठी लागणारी केळीची पाने, केळी खांब, फुले यासह विविध साहित्य मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आले होते तर मोठ्या प्रमाणात मिठाईसह सजावटीसाठी



लागणाऱ्या साहित्य खरेदीकरिता नागरिकांनी गर्दी केली होती. तसेच जुना कौठा, रविनगर, हडको भागातही श्रींच्या पूजेचे साहित्य खरेदीकरिता नागरिकांनी गर्दी केली होती.

सिडको, हडको व कौठा येथील बाजारपेठेत ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक वंसत मुळे, उपनिरीक्षक स्वप्नील साळुंके यांच्यासह सिडको पोलीस चौकीचे अंमलदार रामकृष्ण मोरे, मारोती माने, नरेंद्र यालावार यांच्यासह होमगार्ड पथक बाजारपेठेत चोख नजर ठेवून होते.

# मुंबईतील उपोषणासाठी नांदेड जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा; १६ तालुक्यांतील गावागावांतून सहभागाचे आवाहन

- एक गाव दहा गाड्यांचे नियोजन; प्रत्येक गावातून महिलांसाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था
- शांतता, संयम आणि संविधानिक मार्गाने आंदोलन यशस्वी करण्याचे सकल मराठा समाजाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी) –**मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील सकल मराठा समाजाने व्यापक आणि शिस्तबद्ध सहभागाचे आवाहन केले आहे.

१५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने कूच करण्यात येणार असून, नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांमधील गावागावांतून मोठ्या संख्येने समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पत्रकार परिषदेत करण्यात आले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठीचा हा लढा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी लोकशाही आणि संविधानिक मार्गाने सुरू असलेला व्यापक सामाजिक संघर्ष आहे. त्यामुळे पक्ष, संघटना किंवा वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून समाजहिताच्या या लढ्यात एकजुटीने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

### एक गाव दहा गाड्या; महिलांचा स्वतंत्र सहभाग

मुंबई आंदोलनासाठी नांदेड जिल्ह्यातील गावागावांतून नियोजनबद्ध सहभाग निश्चित करण्यासाठी एक गाव दहा गाड्या ही संकल्पना राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रत्येक गावातून किमान दहा वाहनांचे नियोजन करताना महिलांच्या सहभागासाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात यावी, असे आवाहन करण्यात आले. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच समाजातील सर्व घटकांनी आपल्या क्षमतेनुसार या आंदोलनात सहभागी व्हावे. प्रत्येक गावातील मराठा सेवकांनी सर्कलनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करून घराघरांपर्यंत संवाद साधावा, समाजबांधवांशी संपर्क मजबूत करावा आणि प्रवासाचे आवश्यक नियोजन करावे, असे सांगण्यात आले.

गावागावांतून जनजागृती आणि नियोजन नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये गावपातळीवर विविध माध्यमातून जनजागृती करून मुंबई आंदोलनासाठी समाजबांधवांना एकत्रित करण्याचे आवाहन करण्यात आले.

वाहनांची संख्या, प्रवासाचे नियोजन, महिला सहभाग, आवश्यक साहित्य आणि इतर मूलभूत बाबींची पूर्वतयारी करावी. मात्र या प्रक्रियेत कोणतीही अनधिकृत कृती होणार नाही तसेच कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचणार नाही याची प्रत्येकाने दक्षता घ्यावी.

१५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने कूच करण्यात येणार आहे. नियोजित प्रवासादरम्यान पाटोदा (बीड), श्रीगोंदा (अहिल्यानगर), हडपसर (पुणे) आणि खोपोली (रायगड) येथे मुक्काम करत मुंबईच्या दिशेने मार्गक्रमण करण्यात येणार आहे. त्यानंतर मुंबईतील आझाद मैदान येथे पोहोचून तेथे आमरण उपोषण सातत्याने चालू राहणार आहे. या आंदोलनात नांदेड जिल्ह्याचा लक्षणीय सहभाग असावा, यासाठी गावपातळीवर तयारी करण्याचे आवाहन करण्यात आले.

मुंबईत मोठ्या संख्येने समाजबांधव एकत्र येणार असल्याने प्रत्येक आंदोलकाने जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. आंदोलनाला कोणत्याही प्रकारे गालबोट लागणार नाही, याची काळजी घ्यावी. अफवांवर विश्वास ठेवू नये, सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश प्रसारित करू नयेत, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करू नये, कोणाशीही वाद घालू नये तसेच प्रशासन, पोलीस आणि सर्वसामान्य नागरिकांशी संघर्षाची भूमिका घेऊ नये, असे आवाहन देखील समाजाच्या वतीने करण्यात आले.

आंदोलनादरम्यान प्रशासन व पोलिसांनी दिलेल्या कायदेशीर सूचनांचे पालन करून शांततापूर्ण, संयमी आणि संविधानिक मार्गाने आंदोलन करावे, असेही स्पष्ट करण्यात आले.

### गावातूनच आंदोलनाची ताकद उभी करणार

मुंबईकडे रवाना होण्यापूर्वी प्रत्येक गावात समाजबांधवांशी संवाद वाढवून संपर्क व्यवस्था मजबूत करावी. प्रत्येक गावाने आपल्या क्षमतेनुसार योगदान देत या आंदोलनाला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

महिलांचा सक्रिय सहभाग, युवकांची जबाबदारी आणि ज्येष्ठांचा अनुभव यांची सांगड घालत गावागावांतून संघटित सहभाग उभा करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. हा संघर्ष कोणाविरोधातील द्वेषाचा किंवा संघर्षाचा मार्ग नसून, मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी लोकशाही, संविधान आणि शांततेच्या मार्गाने आपला आवाज सरकारपर्यंत पोहोचविण्याचा लढा आहे. त्यामुळे आंदोलनाची व्यापकता वाढवतानाच त्याची शिस्त, प्रतिष्ठा आणि शांतताही कायम राखण्याची जबाबदारी प्रत्येक समाजबांधवाची आहे.

# कोट्यवधींच्या जमीन घोटाळ्यातील मुख्य आरोपीला १६ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** वजिराबाद पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या जमीन फसवणूक प्रकरणातील मुख्य आरोपी राहुल नागोराव गायकवाड (वय ३८, रा. शिवरायनगर) याला न्यायालयाने १६ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए. जी. चव्हाण यांनी हा आदेश दिला.

पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले होते. तपासी अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने आणि सरकारी वकिलांनी केलेला सडेतोड युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने कोठडी वाढवली.

वजिराबाद पोलीस ठाणे गु.र.नं. २२६/२०२६, कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये हा गुन्हा दाखल आहे. फिर्यादी देवेंद्र शांतीलाल शर्मा (वय ३९, रा. गायत्रीनगर) यांनी तक्रार दिली होती.

मेंढला खुर्द (ता. अर्धापूर) येथील गट क्र. ७३ मधील ० हे. २१ आर जमिनीचा १ कोटी २६ लाख रुपयांचा व्यवहार ठरवून फिर्यादीकडून ३५ लाख रुपये बयाना व रोख स्वरूपात घेण्यात आले. बनावट दस्तऐवज तयार करून तीच जमीन इतरांनाही विकल्याचे उघड झाल्याने फसवणूक झाल्याचे समोर आले.

# उत्साहपूर्ण वातावरणात किनवटमध्ये बाप्पांचे आगमन

**किनवट (प्रतिनिधी)–** 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात, गुलालाची उधळण आणि फटाक्यांच्या आतीषबाजीत सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी किनवट शहर व परिसरात लाडक्या गणरायाचे उत्साहपूर्ण वातावरणात आगमन झाले.

सोमवारी सकाळपासूनच किनवट शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या शिवाजी चौक तसेच गोकुंदा भागात गणेशमूर्ती आणि पूजा साहित्य खरेदीसाठी भाविकांची गर्दी झाली होती. यंदा हरतालिका आणि गणेशचतुर्थी हे दोन्ही सण एकाच दिवशी आल्याने बाजारात खरेदीसाठी नागरिकांचा मोठा उत्साह दिसून आला. सकाळपासूनच ढोल-ताशांचा गजर, गुलाल, फुलांची उधळण करत भाविकांनी घरोघरी गणपती बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना केली.

घरगुती गणपतींच्या आगमनानंतर सायंकाळच्या सुमारास सार्वजनिक गणेश मंडळांनीही मोठ्या थाटामाटात ढोल-ताशांच्या गजरात बाप्पांचे स्वागत केले. फटाक्यांची आतीषबाजी करत सार्वजनिक मंडळांनी श्रींची स्थापना केली. दरम्यान, गणेशोत्सवाच्या या आनंदी काळात शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासनाच्या वतीने कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक आणि संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, गणेशोत्सव शांततेत साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई; गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणारा राजस्थानचा चालक जेरबंद, ८ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हाभरातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्या एका इसमाला अटक करून ८ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी नांदेड ग्रामीण गुन्हे शोध पथक हद्दीत गस्त घालत असताना उस्माननगर रस्त्यावरील कोहिनूर मिलच्या विरुद्ध बाजूस छोटा हत्ती वाहनातून व्यावसायिक सिलिंडरची काळ्या बाजारात विक्री होत असल्याची गुप्त माहिती पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने



पंचांसमक्ष दुपारच्या सुमारास छापा टाकला. त्याठिकाणी टाटा इंट्रा छोटा हत्ती (क्र. MH-26-CH-4677) संशयास्पदरित्या आढळला. झडतीत वाहनात मोठ्या प्रमाणात भारत कंपनीचे व्यावसायिक वापराचे लाल व पिवळ्या रंगाचे सिलिंडर आढळले.

चौकशीत चालकाने त्याचे नाव श्यामलाल शंकरलाल सारन (वय ३२, मूळ रा. बोजासर, जि. फलोदी, राजस्थान, सध्या रा. शिवाजीनगर, मुखेड) असे सांगितले. तो सदर सिलिंडर काळ्या बाजारात विक्री व रिफिलिंगसाठी नेत असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडे वाहतूक व विक्रीचा कोणताही वैध परवाना किंवा कागदपत्रे आढळली नाहीत.

पोलिसांनी टाटा इंट्रा वाहन - अंदाजे किंमत ६ लाख रुपये, ५२ भरलेले व्यावसायिक गॅस सिलिंडर (प्रत्येकी ४ हजार ५०० रुपयाप्रमाणे) - २ लाख ३४ हजार रुपये असा ८ लाख ३४ हजार रुपये आरोपीविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ११८९/२०२६, कलम ३ व ७ जीवनावश्यक वस्तू अधिनियमसह कलम १२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# नांदेडमध्ये अल्पवयीन बालिकेवर लैंगिक अत्याचार; किराणा दुकानाशेजारील बोळात घडला प्रकार, आरोपीविरुद्ध गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** किराणा सामान आणण्यासाठी गेलेल्या एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना शहरात घडली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीवर कठोर कारवाई करावी अन्यथा आंदोलन करू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते रमेश सोनाळे यांनी पोलीस प्रशासनास दिला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पीडित मुलगी ही इयत्ता ७ वी मध्ये शिकत असून दि. १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास किराणा दुकानावर गेली होती. त्यावेळी परिसरातील आदिनाथ ईश्वर जाधव याने तिला काहीतरी औषधी गोळी खायला लावून बेशुद्ध करण्याचा प्रयत्न करीत अत्याचार केला आणि कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन पळून गेला. या प्रकरणी पीडितेच्या आईच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता व पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# भीमराव राऊत यांना पुत्रशोक

**नांदेड (प्रतिनिधी)–**येथील ज्येष्ठ अनुवादक, आंबेडकरवादी विचारवंत भीमराव राऊत यांचे चिरंजीव संदीप (३९) याचे काल पुणे येथे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. पुण्यातील एका मल्टिनॅशनल कंपनीत तो आयटी इंजिनियर होता. सोमवार, दि. १४ रोजी नांदेड येथील गोवर्धन घाट स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या मागे आई -वडील, पत्नी आणि सहा वर्षांची मुलगी आहे.



अंत्यसंस्कार प्रसंगी डॉ.जगदीश कदम, निर्मलकुमार सूर्यवंशी,प्रा. नारायण शिंदे,डॉ.भगवान अंजनीकर, पंडित पाटील, डॉ.विजयकुमार म ाहुरे,सी.आर.पंडित, डॉ.रमेश ढगे आदी उपस्थित होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com